पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

14 वर्ष वर्धापन दिन

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३५१ ■ मंगळवार, दि. ३० जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# डिप्थीरिया, टिटानसच्या ठराविक औषधांवर राज्यात बंदी !

## लसीकरणानंतर १७ वर्षीय मुलीचा मृत्यू, आरोग्य केंद्रांना लस न वापरण्याची सूचना

प्रतिनिधी ३० जून

**नाशिक :** नाशिक शहरातील कामटवाडे भागात 'धनुर्वात आणि घटसर्प' लशीचा बूस्टर डोस घेतल्यानंतर श्रावणी पाटील (१७) या मुलीचा मृत्यू झाला. या घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने डिप्थीरिया आणि टिटानस या औषधांच्या ठरावीक बॅचवर आता संपूर्ण राज्यात तातडीने बंदी घातली आहे. तसेच राज्यातील सर्व शासकीय आरोग्य केंद्रांना लस वापरू नये, अशी सूचना जारी करण्यात आली आहे.

राज्यात या विशिष्ट बॅचच्या एकूण १,६३२ लस बाटल्या वितरित केल्या होत्या. त्यापैकी १,३६० बाटल्यांचा वापर झाला आहे. मात्र, नाशिकमधील गंभीर घटनेनंतर उर्वरित २७२ बाटल्या तत्काळ परत मागवण्यात आल्या आहेत. तसेच लस देण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विशिष्ट सिरिंज, इंजेक्शनच्या एकूण १ लाख ३७ हजार ६०० इंजेक्शन वितरित झाली. त्यापैकी १ लाख ११ हजार २०० इंजेक्शनचा वापर झाला आहे. या संपूर्ण प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी आणि तपासणीसाठी सुमारे ८०० नमुने केंद्रीय औषध प्रयोगशाळा, कसौली (हिमाचल प्रदेश) येथे पाठवण्यात आले आहेत. श्रावणीला ज्या बाटलीतून डोस देण्यात आला, त्याच बाटलीतून अन्य पाच जणांनाही डोस देण्यात आला होता. मात्र, त्या पाचही जणांवर विपरीत परिणाम झालेला नाही. त्यामुळे मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी लस आणि इंजेक्शन या दोन्ही घटकांचे नमुने कसौली येथील राष्ट्रीय प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.



### नेमकी घटना काय?

कामडवाडे शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रात २४ जून रोजी १२ वाजून ४० मिनिटांनी श्रावणीला धनुर्वात व घटसर्प प्रतिबंधक लस देण्यात आली. घरी जात असताना चक्कर येऊन ती खाली कोसळली. पालकांनी तिला खासगी रुग्णालयात नेले, नंतर जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे तिला मृत घोषित करण्यात आले. या प्रकरणाची सखोल चौकशी सुरु करण्यात आली आहे. ज्या व्हायलमधून श्रावणीला लशीचे इंजेक्शन दिले होते, त्यातील शिल्लक लशीचे नमुनेही तपासणीसाठी हिमाचल संस्थेकडे पाठविण्यात आले आहेत. या लशीमध्ये काही दोष तर नाही ना, याचा तपास केला जात आहे.

नाशिकमध्ये लसीकरणानंतर एका १७ वर्षीय मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. आता नेमका मृत्यू कशामुळे झालाय? याचा उलगडा व्हिसेरा अहवाल आल्यानंतरच कळणार आहे. त्यामुळे राज्यभरातील नागरिकांची लक्ष आता व्हिसेरा अहवालाकडे लागलेले दिसून येत आहे.

### असा आहे प्राथमिक निष्कर्ष

धनुर्वात आणि घटसर्प प्रतिबंधक लस दिल्यानंतर लाखातील काही जणांमध्ये ॲलर्जिक प्रतिक्रिया दिसून येते. काही लोकांमध्ये ती अधिक तीव्र असण्याची शक्यता असते. श्रावणीला अशाप्रकारे तीव्र ॲलर्जी झाली असावी. त्यातून ती चक्कर येऊन कोसळल्याने मेंदूला मार लागला, असा निष्कर्ष जिल्हा शल्यचिकित्सकांच्या अध्यक्षतेखालील 'एईएफआय' समितीच्या बैठकीत काढण्यात आला. पालकांच्या म्हणण्यांनुसार, श्रावणीच्या त्वचेवरही अ?लर्जी दिसून आली होती. त्यामुळे शवविच्छेदन केल्यानंतर रक्ताबरोबरच त्वचेचे नमूनेही घेण्यात आहे. 'व्हिसेरा'सह नाशिक व छत्रपती संभाजीनगर येथील न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

## महावितरण अदानींची स्वस्त वीज घेणार

प्रतिनिधी ३० जून

**मुंबई :** महानिर्मितीच्या चार औष्णिक वीजनिर्मिती केंद्रांमधील ३०-३५ वर्षांहून जुन्या संचांमध्ये तयार होणाऱ्या महागड्या विजेची खरेदी थांबवून महावितरण अदानी वीज कंपनीची स्वस्त वीज खरेदी करणार आहे. या संचांची वीज २०२९-३० मध्ये सरासरी प्रति युनिट ६.७७ रुपये मिळेल, असे अपेक्षित असून, अदानी कंपनीची वीज प्रति युनिट ५.३० रुपये दराने मिळणार आहे. ही वीज २०३० पर्यंत उपलब्ध होणार असून, त्यानुसार टप्प्याटप्प्याने महानिर्मितीच्या संचांमध्ये तयार होणाऱ्या विजेची खरेदी बंद केली जाणार आहे.

## उद्यापासून पेट्रोल-डिझेलवरील निर्बंध हटणार !

### केंद्र सरकारचा निर्णय : २०० लिटरचा नियम हटवला

वृत्तसंस्था ३० जून

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या विक्रीवरील लागू केलेले सर्व निर्बंध हटवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. १ जुलैपासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार असल्याने वाहतूक आणि औद्योगिक क्षेत्राला मोठा दिलासा मिळणार आहे.

इराण आणि अमेरिका युद्धामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर खनिज तेलाचा तुटवडा निर्माण झाल्याने केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या विक्रीवर काही निर्बंध लागू केले होते. याशिवाय, या काळात पेट्रोल आणि डिझेलचे भावही कडाडले होते. त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलची गरज असणारे व्यावसायिक चिंतेत पडले होते. मात्र, आता उद्यापासून केंद्र सरकार सर्व निर्बंध हटवणार आहे. या निर्णयामुळे वाहतूक, मालवाहतूक आणि औद्योगिक क्षेत्रातील व्यावसायिक खरेदीदारांना खूप मोठा दिलासा मिळणार आहे. व्यावसायिक वापरासाठीचे पेट्रोल आणि डिझेल रिटेल विक्रेत्यांकडून घेण्यावर निर्बंध होते. डिझेल विक्री प्रति ग्राहक २०० लिटरपर्यंतच अशी मर्यादा लागू करण्यात आली होती.

## ठाकरेंचे विश्वासू सचिन अहिर यांनी शिवबंधन सोडले !

### एकनाथ शिंदे यांचा उद्धव ठाकरेंना दुसरा धक्का

प्रतिनिधी ३० जून

**मुंबई :** शिवसेना (उबाठा) पक्षाचे विधान परिषद आमदार सचिन अहिर यांनी शिवबंधन सोडत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. ऑपरेशन टायगर सुरु असताना ठाकरे पिता पुत्रासाठी हा सर्वात मोठा धक्का मानला जात आहे. सचिन अहिर यांनी विधान परिषदेच्या उपसभापती पदासाठी शिवसेनेकडून उमेदवारी अर्ज दाखल केला. सचिन अहिर हे ठाकरेंचे अत्यंत विश्वासू नेते म्हणून ओळखले जात असतानाच त्यांनी हा निर्णय का घेतला, याचे कारण समोर आले आहे. महाविकास आघाडीत असताना पुन्हा विधान परिषदेवर निवडून जाणं दुरापास्त असल्याने त्यांनी ठाकरेंची साथ सोडल्याची चर्चा आहे.

सचिन अहिर यांचा विधान परिषद कार्यकाळ २०२८ पर्यंत आहे. परंतु महाविकास आघाडीची सध्याची स्थिती पाहता अहिर यांना पुन्हा विधान परिषदेवर निवडून जाणे शक्य दिसत नाही. विधानसभेला उतरायचे झाल्यास त्यांचा बालेकिल्ला असलेल्या वरळी मतदारसंघातून लढणेही शक्य नाही, कारण उबाठाकडून आदित्य ठाकरे तेथील आमदार आहेत.

### निर्णय प्रक्रियेत स्थान नाही

सचिन अहिर हे ठाकरेसेनेच्या उपनेतेपदी असले, तरी निर्णय प्रक्रियेत त्यांना स्थान नसल्याचे बोलले जाते. खासदार संजय दिना पाटील हे अहिर यांचे निकटवर्तीय मानले जातात. पाटील यांच्या पक्षांतरावेळीच अहिर यांनाही ऑफर होती, अशी माहिती आहे. आता विधान परिषद उपसभापतीपदाच्या निवडणुकीचे टायमिंग साधत सचिन अहिर यांनी मोठा धक्का दिल्याचे चित्र आहे.

## कृपाल तुमानेंना विधान परिषद उपसभापतीपदी संधी !

प्रतिनिधी ३० जून



**मुंबई :** विदर्भातील शिंदे सेनेचे मोठे नेते कृपाल तुमाने यांना मोठी संधी मिळणार असल्याचा दावा करण्यात येत आहे. कृपाल तुमाने यांच्या खासदारकीचे तिकीट कापल्या गेले. त्यानंतर ते आमदार झाले. फडणवीस मंत्रिमंडळात मोठी संधी मिळेल असेल वाटत असताना ते वंचित राहिले. पण आता त्यांच्या वाट्याला आलेला दुष्काळ संपला आहे. विधान परिषदेत त्यांना लवकरच मोठी संधी मिळणार असल्याचे जवळपास निश्चित मानले जात आहे. विधान परिषद उपसभापती पद एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडे जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. शिंदे सेनेकडून कृपाल तृमाने यांना संधी देण्यात येणार असल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. उत्तर महाराष्ट्रातूनही चंद्रकांत रघुवंशी हे इच्छुक असल्याचे समजते. त्यांच्या समर्थनार्थ उत्तर महाराष्ट्रातील ९ आमदारांनी पाठिंबा दिल्याचे समजते. पण विधान परिषद उपसभापती पदाची माळ ही कृपाल तुमाने यांच्या गळ्यात पडण्याची शक्यता दाट आहे. त्यांना अगोदर मंत्रीपदाचे आश्वासन देण्यात आले होते. पण त्यांच्या हाती केवळ प्रतीक्षा आली. त्यामुळे आता त्यांचे विधान परिषदेवर पुनर्वसन करण्यात येणार असल्याची माहिती समोर येत आहे. तर ठाकरे गटाकडून या पदासाठी ज. मो. अभ्यंकर यांचा उमेदवारी अर्ज भरण्यात आला आहे.

## जळगावमध्ये महिलेवर सामूहिक अत्याचार !

प्रतिनिधी ३० जून

**जळगाव :** जिल्ह्यातील फत्तेपूर पोलीस ठाणे हद्दीत सामूहिक अत्याचार झाल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी १५ पैकी १४ सह आरोपींना अटक केली आहे. देऊळगाव-कापूसवाडी रस्त्यावरील ठांबरडा नाल्याजवळील निर्जन जंगल परिसरात ४० वर्षीय महिला तिच्या मित्रासोबत बसली असताना, तिच्या मित्रासमोरच दोन आरोपींनी जबरदस्तीने सामूहिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. या घटनेदरम्यान इतर आरोपींनी संपूर्ण प्रकाराचे मोबाईलवर चित्रीकरण केले होते. त्यापैकी एका संशयिताने हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केल्यानंतर प्रकरण चर्चेत आले. घटनेची माहिती मिळताच फत्तेपूर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाला वेग दिला.












सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
मंगळवार, दि. ३० जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

आज मराठी रंगभूमीला भावनांनी समृद्ध करणारे, प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणारे आणि हजारो प्रयोगांद्वारे त्यांच्या काळजात घर करणारे थोर नाटककार, कवी, अभिनेते व दिग्दर्शक बाळकृष्ण हरी कोल्हटकर ऊर्फ बाळ कोल्हटकर यांचा जन्मदिवस. २५ सप्टेंबर रोजी साताऱ्यात जन्मलेले बाळ कोल्हटकर यांचे शिक्षण जेमतेम सातवीपर्यंतच झाले. पण रंगभूमीचे वेड आणि लेखनाचा झपाटाच त्यांच्या जीवनाला वेगळी दिशा देणारा ठरला.

# वारकऱ्यांच्या चरण सेवेला प्रारंभ

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची उपक्रम

मुंबई: आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरकडे पायी मार्गस्थ होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे 'चरण सेवा' उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध आरोग्य संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांच्या चरणसेवेला प्रारंभ झाला आहे. त्यात आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार आणि आरोग्य जनजागृतीच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.



चरण सेवेकरिता समन्वय

वारकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'चरण सेवा' उपक्रमात सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या ११ प्रमुख जिल्ह्यांचा समावेश आहे. पालखी मार्गावरील सुमारे ४०० विश्रांती व मुक्काम स्थळी वारकऱ्यांसाठी चरण सेवा, वैद्यकीय तपासणी, प्राथमिक उपचार तसेच आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयातून १२ हजारांहून अधिक प्रशिक्षित डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय व फिजिओथेरपीचे विद्यार्थी तसेच स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी होऊन वारकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत असतील.

**३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाद्वारे मालिश**

आषाढी वारीदरम्यान दररोज अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायांवर मोठा ताण येतो. पायांना सूज, वेदना, फोड, स्नायूंचा ताण व थकवा यांसारख्या समस्यांवर तात्काळ उपाययोजना उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी प्रशिक्षित वैद्यकीय पथके व स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत.

या उपक्रमांतर्गत औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी सुमारे ३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाची व्यवस्था करण्यात आली असून, गरजेनुसार पालखी मार्गावर रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.

**८ आरोग्य रथाद्वारे जनजागृती**

चरण सेवेसोबतच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैलीचा संदेश तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून पालखी मार्गावरील वारकरी आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. तसेच, वारकऱ्यांच्या शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीसाठी पालखी मार्गावरील निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे.

गतवर्षी राबविण्यात आलेल्या 'चरण सेवा' उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. या उपक्रमाद्वारे सुमारे १ लाख ७५ हजार वारकऱ्यांना थेट चरण सेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, तर १० लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला होता. यंदाही अधिकाधिक वारकऱ्यांपर्यंत चरण सेवा, वैद्यकीय सुविधा आणि आरोग्य जनजागृती प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

**'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची'**

'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची' या संकल्पनेवर आधारित 'चरण सेवा' हा उपक्रम वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देणारा अभिनव उपक्रम आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकारातून जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे वारकऱ्यांचा पायी प्रवास अधिक सुरक्षित, सुदृढ आणि सुखकर होण्यास मोठी मदत होणार आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने सर्व वारकरी, दिंडी प्रमुख तसेच पालखी मार्गावरील नागरिकांना 'चरणसेवा' आणि आरोग्य जनजागृती उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

**चरणसेवा म्हणजे काय?**

संत तुकाराम महाराजांनी ठतुज मागणें तें देवा, आम्हां तुझी चरण सेवाठ या अभंगातून चरण सेवेचे महत्व अधोरेखित केले आहे. त्याच सेवाभावातून प्रेरणा घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून 'चरण सेवा' उपक्रम गेल्या वर्षीपासून सुरू करण्यात आला आहे. यंदा या उपक्रमाचे दुसरे वर्ष आहे.

आषाढी वारीत अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायावर मोठा ताण येत असल्याने त्यांना औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, आधुनिक मसाज उपकरणांच्या साहाय्याने स्नायूंना आराम, सूज, वेदना व फोडांवर प्राथमिक उपचार तसेच आवश्यकतेनुसार वैद्यकीय तपासणी व पुढील उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.


वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देत सेवाभावातून आधार देणारी हीच 'चरणसेवा' होय. संत तुकाराम महाराजांच्या सेवाभावाच्या विचारांना आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देत वारकरी परंपरा आणि लोकसेवेचा सुंदर संगम या उपक्रमातून घडविण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वातून आणि सेवाभावी दृष्टिकोनातून 'चरण सेवा' उपक्रम साकार झाला आहे. वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देणारा हा एक अभिनव उपक्रम असून, आषाढी वारीत लाखो वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देतानाच त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न या माध्यमातून होत आहे. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा मानत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष विविध संस्थांच्या समन्वयातून यंदाही ही चरण सेवा अधिक व्यापक स्वरूपात वारकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यास सज्ज असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.



# मराठी रंगभूमीचे भावसम्राट बाळ कोल्हटकर!

**(जन्म : २५ सप्टेंबर १९२६, - मृत्यू : ३० जून १९९४)**



आज मराठी रंगभूमीला भावनांनी समृद्ध करणारे, प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणारे आणि हजारो प्रयोगांद्वारे त्यांच्या काळजात घर करणारे थोर नाटककार, कवी, अभिनेते व दिग्दर्शक बाळकृष्ण हरी कोल्हटकर ऊर्फ बाळ कोल्हटकर यांचा जन्मदिवस.

२५ सप्टेंबर रोजी साताऱ्यात जन्मलेले बाळ कोल्हटकर यांचे शिक्षण जेमतेम सातवीपर्यंतच झाले. पण रंगभूमीचे वेड आणि लेखनाचा झपाटाच त्यांच्या जीवनाला वेगळी दिशा देणारा ठरला. अवघ्या १५ व्या वर्षी त्यांनी 'जोहार' हे पहिले नाटक लिहिले आणि मराठी नाट्यसृष्टीत एका नव्या पर्वाची सुरुवात झाली.

रेल्वे खात्यात नोकरी करत असतानाही, त्यांच्या अंतर्मनात नाट्याची धग धगधगत राहिली. अखेर १९४७ साली त्यांनी सरकारी नोकरी सोडून संपूर्ण जीवन रंगभूमीस अर्पण केलं. त्यांनी लिहिलेली नाटकं ही भावनाप्रधान, कौटुंबिक आणि जीवनाच्या गहिऱ्या विसंगतींवर बोट ठेवणारी होती. 'दुरितांचे तिमिर जावो', 'वाहतो ही दुर्वांची जुडी', 'मुंबईची माणसे', 'एखाद्याचे नशीब' ही त्यांची नाटके आजही रसिकांच्या मनात घर करून आहेत.

प्रत्येक नाटकात बाळ कोल्हटकर यांचा प्रेक्षकांच्या भावना ओळखण्याचा अद्वितीय दृष्टिकोन दिसून येतो. त्यांची संवादशैली, प्रसंगांची रचना आणि भावनिक उत्कटता ही सामान्य प्रेक्षकांनाही अश्रू पुसायला लावायची. त्यांच्या नाटकांना मिळालेल्या प्रतिसादावरून हेच दिसते. 'दुरितांचे तिमिर जावो' चे १५००, 'वाहतो ही दुर्वांची जुडी' चे १४००, 'मुंबईची माणसे' चे जवळपास २००० आणि 'एखाद्याचे नशीब' चे हजारो प्रयोग झाले.

१९५९ ते १९७२ दरम्यान अंबरनाथच्या खेर विभागात वास्तव्यास असलेले कोल्हटकर, तिथेच त्यांनी अनेक लोकप्रिय नाटकांची रचना केली. 'वेगळं व्हायचंय मला', 'सीमेवरून परत जा', 'देणार्याचे हात हजार', 'लहानपणा देगा देवा', 'उघडलं स्वर्गाचे दार' यांसारखी नाटके ही केवळ मनोरंजन करणारी नव्हती, तर त्या काळात समाजमनाचा आरसा ठरणारी होती.

ते केवळ नाटककार नव्हे, तर एक जबरदस्त अभिनेता म्हणूनही त्यांची ओळख होती. त्यांच्या अभिनयाने पात्रं जिवंत झाली. प्रेक्षकांच्या मनात त्यांचे डायलॉग आजही लक्षात राहतात. एक नाटककार, अभिनेता आणि दिग्दर्शक म्हणून त्यांनी मराठी रंगभूमीला समृद्ध केलं.

बाळ कोल्हटकर यांचे निधन ३० जून १९९४ रोजी झाले. पण त्यांच्या आठवणी, त्यांची नाटके आणि त्यांचं लेखन आजही जिवंत आहे. अंबरनाथच्या खेर विभागातल्या 'भूषण' या त्यांच्या बंगल्याने आजही त्यांची आठवण जागवली जाते. आणि २००९-१० साली त्यांच्या सन्मानार्थ सुरू झालेला 'बाळ कोल्हटकर ज्येष्ठ नागरिक कट्टा' हा त्या प्रेमाचे प्रतिक आहे.

एक अढळ नाट्यतेजष्ठ बाळ कोल्हटकर हे नुसते नाटक लिहिणारे नाटककार नव्हते, तर त्यांनी रंगभूमीच्या माध्यमातून सामान्य माणसाच्या भावना, दुःख, संघर्ष आणि आशा शब्दांत आणि संवादांत जपल्या. म्हणूनच ते केवळ लेखनीत नव्हे, तर प्रत्येक प्रेक्षकाच्या मनात अढळ स्थानी आहेत. बाळ कोल्हटकर यांना स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन!

**दिन विशेष**

# 'द बॅडेस्ट मॅन ऑन द प्लॅनेट'



**माइक टायसन यांचा आज जन्मदिवस**

माइक जेरार्ड टायसन यांचा जन्म ३० जून १९६६ मध्ये ब्रुकलिन, न्यूयॉर्क शहर, अमेरिका येथे झाला. ते लोखंड, किड डायनामाइट या टोपण नावानेही ते ओळखले जात. ग्रहावरील सर्वात खतरनाक माणूस त्यांची कीर्ती होती.

मायकल जेरार्ड टायसन हा एक अमेरिकन माजी व्यावसायिक बॉक्सर आहे, ज्याने १९८५ ते २०२४ दरम्यान स्पर्धा केली आणि तो एक कॅनॅबिस उद्योजक आहे. त्याच्या सुरुवातीच्या कारकिर्दीत ' आयर्न माइक' आणि' किड डायनामाइट' अशी टोपणनावे असलेला आणि नंतर 'द बॅडेस्ट मॅन ऑन द प्लॅनेट' म्हणून ओळखला जाणारा टायसन, सर्वकालीन महान हेवीवेट बॉक्सरपैकी एक. बॉक्सिंग इतिहासातील सर्वात भीतीदायक पुरुषांपैकी एक मानला जातो. त्याने १९८७ ते १९९० पर्यंत निर्विवाद जागतिक हेवीवेट चॅम्पियन म्हणून राज्य केले.

टायसनने त्याच्या पहिल्या १९ व्यावसायिक लढती नॉकआउटने जिंकल्या, त्यापैकी १२ पहिल्याच फेरीत. वयाच्या २० व्या वर्षी आपला पहिला बेल्ट जिंकून, टायसनने हेवीवेट विजेतेपद जिंकणारा सर्वात तरुण बॉक्सर म्हणून विक्रम प्रस्थापित केला आहे. तो वर्ल्ड बॉक्सिंग असोसिएशन, वर्ल्ड बॉक्सिंग कौन्सिल आणि इंटरनॅशनल बॉक्सिंग फेडरेशन ही विजेतेपदे एकाच वेळी धारण करणारा पहिला हेवीवेट बॉक्सर होता. तसेच ती सलगपणे एकत्रित करणारा तो एकमेव हेवीवेट होता. पुढच्या वर्षी, टायसनने पहिल्या फेरीच्या ९१ सेकंदात मायकल स्पिंक्सला नॉकआउट करून लिनिअल चॅम्पियन बनला. १९९० मध्ये, टायसनने निर्विवाद हेवीवेट चॅम्पियनशिप गमावली जेव्हा त्याला अनपेक्षित बस्टर डग्लसने नॉकआउट केले, ज्यामुळे बॉक्सिंगच्या इतिहासातील हा सर्वात मोठा धक्कादायक निकाल ठरला. १९९२ मध्ये, त्याला बलात्कारासाठी दोषी ठरवून सहा वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली. तीन वर्षांनंतर त्याची पॅरोलवर सुटका झाली. १९९५ मध्ये तुरुंगातून सुटल्यानंतर, त्याने पुनरागमनाच्या अनेक लढती लढल्या आणि १९९६ मध्ये डब्ल्यूबीए, डब्ल्यूबीसी विजेतेपद पुन्हा मिळवून तो बॉक्सिंगच्या इतिहासातील फ्लॉइड पॅटरसन, मुहम्मद अली, टिम विदरस्पून, इव्हेंडर होलीफील्ड आणि जॉर्ज फोरमन यांच्या पंक्तीत सामील झाला, ज्यांनी हेवीवेट चॅम्पियनशिप गमावल्यानंतर ती पुन्हा मिळवली. त्याच वर्षी डब्ल्यूबीसी विजेतेपद काढून घेतल्यानंतर, टायसनने अकराव्या फेरीत इव्हेंडर होलीफील्डकडून डब्ल्यूबीए विजेतेपद गमावले. १९९७ मधील त्यांच्या पुनर्भेट लढतीत, टायसनने होलीफील्डचे कान चावल्यामुळे त्याला अपात्र ठरवण्यात आले. २००२ मध्ये, टायसनने जागतिक हेवीवेट विजेतेपदासाठी लढत दिली, ज्यात तो लेनॉक्स लुईसकडून नॉकआउटने हरला . नोव्हेंबर २०२४ मध्ये, जेक पॉल विरुद्धची त्याची लढत, जी तो एकमताने घेतलेल्या निर्णयाने हरला, लास वेगास बाहेरील अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात मोठी बॉक्सिंग गेट ठरली.

टायसन त्याच्या भयंकर आणि भीतीदायक बॉक्सिंग शैलीसाठी तसेच रिंगच्या आत आणि बाहेरच्या त्याच्या वादग्रस्त वागणुकीसाठी ओळखला जात होता, ज्याबद्दल त्याने स्पष्ट केले की त्याला सोनी लिस्टनकडून प्रेरणा मिळाली होती , जो त्याच्या ताकद आणि दहशतीसाठी ओळखला जातो. १९ ८८ टक्केच्या नॉकआउट-टू-विन टक्केवारीसह, त्याला 'द रिंग ' मासिकाच्या सर्वकालीन १०० महान पंचर्सच्या यादीत १६ व्या क्रमांकावर स्थान देण्यात आले होते, आणि एिं- च्या 'हेवीवेट इतिहासातील सर्वात हार्डेस्ट हिटर्स' च्या यादीत पहिल्या क्रमांकावर होते. स्काय स्पोर्ट्सने त्याचे वर्णन 'व्यावसायिक रिंगमध्ये उतरलेला कदाचित सर्वात भयंकर फायटर' असे केले आहे. त्याला आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग हॉल ऑफ फेम आणि जागतिक बॉक्सिंग हॉल ऑफ फेममध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. आपल्या बॉक्सिंग कारकिर्दीव्यतिरिक्त, टायसन विविध लोकप्रिय माध्यमांमध्ये दिसला आहे. तो रॉकी बाल्बोआ (२००६) आणि द हँगओव्हर (२००९) या प्रशंसित चित्रपटांमध्ये दिसला.

**हौशी कारकीर्द**

एक हौशी खेळाडू म्हणून , टायसनने १९८१ आणि १९८२ च्या ज्युनियर ऑलिम्पिक खेळांमध्ये सुवर्णपदके जिंकली, १९८१ मध्ये जो कॉर्टेझला आणि १९८२ मध्ये केल्टन ब्राउनला हरवले. ब्राउनच्या कॉर्नरने पहिल्या फेरीतच टॉवेल फेकला. १९८४ मध्ये टायसनने न्यूयॉर्कमध्ये आयोजित नॅशनल गोल्डन ग्लोजमध्ये जोनाथन लिटल्सला हरवून सुवर्णपदक जिंकले. एक हौशी खेळाडू म्हणून तो हेन्री टिलमनसोबत दोनदा लढला, दोन्ही लढतींमध्ये तो निर्णयाने हरला. टिलमनने पुढे लॉस एंजेलिसमध्ये १९८४ च्या उन्हाळी ऑलिम्पिकमध्ये हेवीवेट सुवर्णपदक जिंकले. त्याने हौशी खेळाडू म्हणून २४ विजय आणि ३ पराभवांचा विक्रम नोंदवला.

**पदक विक्रम**

पुरुषांची हौशी बॉक्सिंग

राष्ट्रीय ज्युनियर ऑलिम्पिक्स

सुवर्णपदक – प्रथम क्रमांक १९८१ नॉर्थ कॅरोलिना हेवीवेट

सुवर्णपदक – प्रथम क्रमांक १९८२ टेनेसी हेवीवेट

सोनेरी हातमोजे

सुवर्णपदक – प्रथम क्रमांक १९८४ न्यूयॉर्क हेवीवेट

# महाकर्जमुक्तीची संजीवनी

नैसर्गिक संकट व कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या शेतकरी बांधवांना पुन्हा सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' सुरू केली आहे. ही योजना शेतकरी बांधवांना सन्मानाने जगण्याची आणि नव्या उमेदीने शेती करण्याची संधी देणारी 'नवसंजीवनी' ठरणार आहे. या योजनेविषयी ही माहिती...

महाराष्ट्र राज्याची एक ओळख प्रगतीशील आणि पुरोगामी राज्य म्हणूनही आहे. आपल्या राज्याने कृषी क्षेत्रात अनेक शिखरे पादाक्रांत करीत देशालाच नव्हे तर जगाला सुद्धा नवनवे शोध व प्रयोग देऊन शेती प्रगत करण्याचे तंत्र दिले आहे. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. परंतु, गेल्या काही वर्षांत निसर्गाचे चक्र पूर्णपणे बदलले असून अवेळी येणारा पाऊस, तीव्र दुष्काळ, तर कधी गारपीट, अतिवृष्टी आणि महापूर... यासारख्या एकामागून एक येणाऱ्या या नैसर्गिक संकटांमुळे राज्यातील बळीराजा पुरता कोलमडून गेला आहे. कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या या शेतकरी बांधवांला पुन्हा पायावर उभे करण्यासाठी राज्य शासनाने एक अत्यंत महत्वाकांक्षी आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. ते म्हणजे 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'. ही योजना केवळ एक तात्पुरती कर्जमुक्ती नसून, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना सन्मानाने जगण्याची आणि नव्या उमेदीने शेती करण्याची संधी देणारी 'नवसंजीवनी' ठरणार आहे.

अंमलबजावणी अंतिम टप्प्यात

राज्य शासनाची आजवरची सर्वात मोठी महाकर्जमुक्ती योजना म्हणून या योजनेकडे पाहिले जात आहे. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आली आहे. प्रशासकीय पातळीवर सर्व तयारी पूर्ण झाली असून, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या थेट कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार आहे. या निर्णयामुळे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर लाखो शेतकरी कुटुंबांना खूप मोठा दिलासा मिळणार आहे.

योजनेची त्रिसूत्री - कर्जमुक्ती लाभ

या योजनेचे स्वरूप केवळ कर्जमुक्ती नाही तर, विविध प्रवर्गातील शेतकऱ्यांचा विचार करून याची अत्यंत अभ्यासपूर्ण आखणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने तीन घटकांचा समावेश आहे:

यात २ लाख रुपयांपर्यंत संपूर्ण कर्जमुक्ती: जे शेतकरी थकबाकीदार आहेत, अशा पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा थेट लाभ दिला जात आहे. यापूर्वीच्या 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने'चे लाभार्थी असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठीही शासनाने यात विशेष व स्वतंत्र तरतूद केली आहे.

एकवेळ समझोता योजना : ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी 'वन टाईम सेटलमेंट' म्हणजेच एकवेळ समझोता योजना लागू करण्यात आली आहे. यात शेतकऱ्यांनी आपल्या हिश्शाची रक्कम भरल्यानंतर, राज्य शासन कर्जमुक्ती रक्कम थेट शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन: अनेक शेतकरी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही बँकेच्या कर्जाची नियमित परतफेड करतात. अशा प्रामाणिक कर्जदार शेतकऱ्यांमध्ये अन्यायाची भावना निर्माण होऊ नये, म्हणून शासनाने त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे.

डिजिटल तंत्रज्ञान आणि पारदर्शकता

कर्जमुक्ती योजनेच्या अंमलबजावणी मध्ये तांत्रिक अडचणी आणि दिरंगाई होऊ नये यासाठी राज्य शासनाने 'महाआयटी'च्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवली आहे.

सर्व बँकांकडून पात्र कर्जखात्यांचा तपशील थेट पोर्टलवर घेतला जात असून, संगणकीय पडताळणीद्वारे अंतिम याद्या तयार केल्या जात आहेत. या याद्या शेतकऱ्यांना सहज पाहता याव्यात यासाठी गाव चावडी, ग्रामपंचायत, बँक शाखा, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्र येथे प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे, पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर बँकांमार्फत संदेश पाठवूनही सूचित केले जाणार आहे.

'आधार प्रमाणिकरण' अनिवाय.

'शेतकऱ्यांनी योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन, पारदर्शक आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांनी यादीत नाव आल्यानंतर लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या आधार नंबर किंवा यादीतील विशिष्ठ नंबरसह 'आपले सरकार सेवा केंद्रात' किंवा बँकेत जाऊन आपल्या कर्जखात्याचे बायोमेट्रिक/आधार प्रमाणीकरण करणे गरजेचे आहे.

ही माहिती योग्य असल्याची खात्री करून शेतकऱ्यांनी मान्यता दिली, की शासनाकडून थेट कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल.आणि एकवेळ समझोता (ध्ऊए) योजनेतील लाभार्थ्यांनी प्रथम त्यांचा हिश्शाची रक्कम भरणे आवश्यक आहे, त्यानंतरच शासनाचा कर्जमुक्तीचा लाभ शेकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल.यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे.

तक्रार निवारणासाठी यंत्रणा

योजनेच्या पारदर्शकतेवर शासनाने विशेष भर दिला आहे. कर्जखात्याच्या माहितीत किंवा बँक तपशीलात काही तांत्रिक त्रुटी असल्यास शेतकऱ्यांना दाद मागता यावी, म्हणून सक्षम तक्रार निवारण व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. तसेच या तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष समितीसुद्धा नियुक्त करण्यात आली आहे.

उत्तम प्रशासकीय समन्वय

राज्य शासनाच्या सहकार विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, बँका, महाआयटी, ग्रामपंचायती आणि स्थानिक प्रशासन या सर्व घटकांमध्ये राज्य शासनाने अचूक समन्वय साधला आहे. विविध स्तरांवर कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिल्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि गतिमान झाली आहे..

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ च्या माध्यमातून राज्यातील लाखो शेतकरी पुन्हा एकदा 'कर्जमुक्त' होऊन 'कर्जपात्र' होणार आहेत. त्यांना नवीन पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू होणा-या कर्जमुक्तीचा लाभ राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला एक नवी गती, नवी ऊर्जा आणि शेतकऱ्यांना सन्मानाने जगण्याची नवी संजीवनी देणारा ठरेल यात शंका नाही.

विभागीय माहिती कार्यालय
अमरावती

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# माहेश्वरी समाजाच्या वतीने विविध कार्यक्रम संपन्न

प्रतिनिधी ३० जून



**मुर्तिजापूर** : ज्येष्ठ शुक्ल नवमी, २३ जून म्हणजे सर्व माहेश्वरी समाजाचे गौरव, संस्कृती, संघटन, संस्कार आणि सामूहिक चेतनेचे प्रतीक असलेला 'महेश नवमी' चा दिवस. सगळे माहेश्वरी बंधु- बांधव हा उत्सव अतिशय श्रद्धा, उत्साह आणि अभिमानाने साजरा करतात.

तालुका माहेश्वरी संघटनाच्या वतीने माहेश्वरी समाजाचे त्रिदिवसीय महेश नवमी महोत्सव २०२६ मोठ्या उत्साहात २१ ते २३ जून २०२६ पर्यंत राधा मंगलम तिडके नगर, मूर्तिजापूर येथे आयोजित करण्यात आले.

२१ जून रोजी सकाळी ५.३० ते ७ वाजेपर्यंत अंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त सौ.राजश्री सतीश सारडा यांच्याद्वारे सोमाणी कांप्लेक्स येथे योग शिबिर घेण्यात आला. त्यानंतर ९ वाजता गणेश मंदिर परिसरात वृक्षारोपण झाले. दुपारी ४ वाजता शिवराणा गड वृद्धाश्रम, सिरसो येथे वृद्धांना फळं वितरित करण्यात आली. संध्याकाळी ६ वाजता पुंडलिक बाबा गोरक्षण रेपाळखेड येथे माहेश्वरी समाजाच्या वरिष्ठांकडून, महिलामंडळाद्वारे, प्रगति मंडळ, नवयुवक संगठन व समाजातील सर्व घटकांद्वारे गौसेवा करण्यात आली.

सकाळी बॉक्स क्रिकेट स्पर्धा तद्नंतर दुपारी राधा मंगलम कार्यालय येथे मास्टर शेफ स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा, स्टोरी टेलिंग स्पर्धा , ड्राइंग स्पर्धा , अंताक्षरी स्पर्धा व विविध सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. रक्तदान शिबिरात सुद्धा ४५ लोकांनी रक्तदान केले. संध्याकाळी माहेश्वरी महिला मंडळाद्वारे शानदार ँद नाटिका सादर करण्यात आली. शेवटी माहेश्वरी प्रगती मंडळाद्वारे आयोजित जवळपास ३५ लहान मुलं आणी मुलीं द्वारे अप्रतिम १२ ज्योतिर्लिंगांच्या कहाणीची संगीतमय प्रस्तुति करण्यात आली. या कार्यक्रमात समाजजनांनी संपूर्ण परिवारासह उपस्थित राहुन कलाकारांचा उत्साह वाढविला. तारीख २३ जून मंगळवार रोजी कार्यक्रमाची सुरुवात महेश पूजन, स्वागत गीत आणी सुंदर स्वागत नृत्याने झाली. मंचावर महोत्सवाचे कार्यक्रमाध्यक्ष श्यामसुंदर सोमाणी व प्रमुख अतिथी म्हणून ठाकुरदास मालाणी (अमरावती) व सी.ए. नीरजजी नंदकिशोर राठी (अकोला) , माहेश्वरी समाज ट्रस्ट चे अध्यक्ष रामेश्वरजी बुब, मुर्तिजापूर तालुका माहेश्वरी संघटन चे अध्यक्ष पुरुषोत्तमजी डागा, महिला मंडल च्या अध्यक्षा डॉ. सरीता सिकची, नवयुवक संघटन

# मोहरमच्या पवित्र पर्वावर टँकर ड्रायव्हर्सकडून 'लंगर' चे आयोजन

♦ सामाजिक सलोख्याचे दर्शन, अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सहभाग



प्रतिनिधी ३० जून

**अकोला :** मोहरम या पवित्र महिन्याचे औचित्य साधत आणि या महिन्याच्या पवित्रतेचा आदर करत, रिपब्लिकन टँकर युनियन महाराष्ट्र ड्रायव्हर हेल्पर संघटनेच्या वतीने इंडियन ऑईल कंपनीच्या वाहनचालक आणि श्रमिकांसाठी एका भव्य लंगर-ए-हुसैनी चे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. सामाजिक सलोखा भावनेतून हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

आय.ओ.सी.एल. चे मयंक गोयल सर यांच्या मुख्य उपस्थितीत हा छोटेखानी पण गरिमापूर्ण कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी अविनाश सर, राहुल सर, राम बगेरे, शेख जन्नोद्दीन, राजू यादव, काळपांडे सर, महेंद्र सर, निशांत सर, प्रमोद सर आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी मान्यवर अतिथींचे पुष्पगुच्छ देत स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रिपब्लिकन टँकर युनियन महाराष्ट्र ड्रायव्हर हेल्पर संघटनेचे खंबीर नेतृत्व व अध्यक्ष मोहम्मद शकील, अकोला जिल्हाध्यक्ष अहमद खान पैलवान, आणि आय.ओ.सी.एल. अध्यक्ष फय्याझोद्दीन मुम्ताझ खान, बीपीसीएल अध्यक्ष राजू भाई, शारीख खान मतिन खान, यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच बी.पी.सी.एल. अध्यक्ष राजू भाई यांनीही या कार्यक्रमाला हजेरी लावून प्रोत्साहन दिले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शारीक खान, मतीन भाई, करीम खान, शेख इरफान, शेख समीर, शेजवान खान, गोपाल पाठक, मुम्ताज भाई, वैभव भिसे, वहिद भाई, सिकंदर भाई, सबीर भाई उर्फ दया, संदीप कांबळे, जुनेद खान, अलिमोद्दीन आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. मोहरमच्या निमित्ताने सर्व चालकांनी एकत्र येत दाखवलेली ही एकजुट आणि सेवाभाव सर्वांसाठी कौतुकास्पद ठरली आहे.

# अडगाव बु. येथे मोहरम सण शांततेत साजरा

प्रतिनिधी ३० जून

**अडगाव बु. :** येथे मोहरम सण अत्यंत पवित्र आणि शांततापूर्ण वातावरणात संपन्न झाला. गावातील हिंदू आणि मुस्लिम बांधवांनी एकत्र येत धार्मिक सलोख्याची परंपरा कायम राखत हा सण साजरा केला.

**धार्मिक विधी आणि मिरवणूक**

मोहरमच्या मुख्य दिवशी गावातील मानाच्या सवारीची (ताजिया/दर्गा) स्थापना करण्यात आली होती. यादरम्यान विविध धार्मिक विधी पार पडले. मुस्लिम बांधवांनी 'या हुसेन'च्या घोषणा देत आणि करबला येथील बलिदानाचा स्मृतींना उजाळा देत मिरवणूक काढली. या मिरवणुकीत गावातील अबालवृद्धांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.

**सामाजिक सलोखा आणि एकोपा**

अळगाव बु! येथील मोहरमचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे या सणामध्ये गावातील हिंदू बांधवही मोठ्या संख्येने सहभागी होतात. अनेक कुटुंबांनी मोहरमनिमित्त नवस फेडले, तर काहींनी



मिरवणुकीच्या मार्गावर पाणी आणि शरबताचे वाटप करून हिंदू-मुस्लिम एकोप्याचे एक उत्तम उदाहरण समाजासमोर ठेवले.

**प्रशासन व पोलिसांचे चोख नियोजन**

सण शांततेत पार पाडण्यासाठी स्थानिक पोलीस प्रशासन आणि ग्रामपंचायतीच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. गावातील शांतता समितीच्या सदस्यांनी आणि तरुणांनी स्वयंसेवक म्हणून चोख भूमिका बजावली. कुठेही अनुचित प्रकार न घडता, अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने मिरवणूक निघाली.

# नऊ कुंडी यज्ञ, गायत्री परिवाराचे आयोजन



प्रतिनिधी ३० जून

**अकोला :** वारकरी सम्प्रदाय, गायत्री परिवार, गुरूदेव सेवा मंडल द्वारे अंबामाता संस्थान डोंगरगांव अकोला येथे आयोजित नऊ कुंडी गायत्री महायज्ञ व शंभर पेक्षा अधिक बालगोपालांचे सामुहिक विद्यारंभ संस्कार झाले. गायत्री परिवारचे डॉ. अजय उपाध्याय यांनी पुढाकार घेतला होता.महायज्ञ साक्षीत गर्भसंस्कार, वाढदिवस जन्मदिवसोत्सव संस्कार संपन्न झाले. सर्वाना पंडित श्रीराम शर्मा आचार्य रचित साहित्य भेंट स्वरूप देण्यात आले दुपारी गर्भसंस्कार मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित केली होती. यामिनी दीदी यांनी मार्गदर्शन केले. महायज्ञ पौरोहित्य अभय महाराज उपाध्ये, पल्लवी चवरे, मंजूषा भामबुरकर, डॉ. अजय उपाध्याय, यामिनी दीदी यांनी केले. आभार प्रदर्शन हरिभक्त परायण उमेश महाराज साबळे यांनी केले. विनोद नटकूट महाराज, साबळेताई, व डोंगरगांव गावकरींनी सुंदर आयोजन साठी परिश्रम घेतले.

# मुख्यमंत्री व पोलीस महासंचालकांकडे केलेल्या तक्रारीची दखल ; कारवाईबाबत जावेद जकारिया यांना उत्तर

प्रतिनिधी ३० जून

**अकोला :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवारचे प्रदेश संघटक सचिव जावेद जकरिया यांनी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथे घडलेल्या कथित भोंदूबाबा प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तसेच पोलीस महासंचालक (डीजीपी) यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत संबंधित पोलीस प्रशासनाने कारवाई करून त्याबाबतचे अधिकृत उत्तर जावेद झकारिया यांना पाठविले आहे. प्राप्त उत्तरानुसार, सिन्नर पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण यांनी तक्रारीची सखोल चौकशी केली असून संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायदा तसेच भारतीय न्याय संहिता (ँ ए) मधील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र (चार्जशीट) दाखल करण्याची कार्यवाहीही सुरू करण्यात आली असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. याबाबत प्रतिक्रिया देताना जावेद झकारिया म्हणाले की, मुख्यमंत्री आणि पोलीस महासंचालक यांनी तक्रारीची तात्काळ दखल घेत संबंधित यंत्रणेला योग्य निर्देश दिल्यामुळे दोषींवर कायदेशीर कारवाई झाली आहे. राज्य सरकार अंधश्रद्धा, भोंदूगिरी आणि कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर भूमिका घेत असल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. जावेद झकारिया यांनी मुख्यमंत्री, पोलीस महासंचालक तसेच नाशिक ग्रामीण पोलीस प्रशासनाचे आभार मानत, अशा प्रकारे जनतेची फसवणूक करणाऱ्या आणि अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या व्यक्तींविरुद्ध भविष्यातही कठोर कारवाई सुरू ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच नागरिकांनी अशा प्रकारच्या बेकायदेशीर व अंधश्रद्धेला प्रोत्साहन देणाऱ्या घटनांची माहिती प्रशासनाला देऊन समाजहितासाठी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# दुचाकी अपघातात एक ठार

प्रतिनिधी ३० जून

**पातूर :** झरंडी–सावरगाव मार्गावरील वळणावर मोटारसायकलीची धडक होऊन दुर्दैवी अपघात झाला. या अपघातात सावरगाव येथील आकाश शेषराव शिंदे यांचा घटनास्थळीच दुर्दैवी मृत्यू झाला असून, झरंडी येथील दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत.

घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना रुग्णवाहिकेद्वारे अकोला येथील रुग्णालयात उपचारासाठी हलविण्याची व्यवस्था केली. जखमींवर उपचार सुरू आहेत.



# हिवरखेड अकोला थेट बसला ग्रीन सिग्नल

प्रतिनिधी ३० जून

♦ अ. भा. ग्रामीण पत्रकार संघाच्या मागणीला यश



**हिवरखेड :** शहरापासून अकोला जिल्हा मुख्यालयी जाण्यासाठी थेट बस सेवा उपलब्ध होण्यासाठी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ हिवरखेड द्वारे केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना यश आले असून हिवरखेड अकोला थेट बस सेवेचा शुभारंभ करण्यात आला आहे.

प्रवाशांचे हेलपाटे पाहून अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ हिवरखेडच्या पत्रकार बांधवांनी अर्जुन खिरोडकार यांच्या पुढाकारातून हिवरखेड अकोला थेट बस सेवेसाठी पाठपुरावा सुरू केला. त्याला तेल्हाराचे आगार प्रमुख मिथुन शर्मा यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. यामध्ये तेल्हारा येथील सामाजिक कार्यकर्ते आनंद राठी यांनी सुद्धा महत्त्वाची भूमिका बजावली.

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे केंद्रीय कार्याध्यक्ष मनोहर सुने, प्रदेशाध्यक्ष कैलासबापू देशमुख, प. विदर्भ प्रमुख नानाभाऊ इंगोले इत्यादींच्या मार्गदर्शनात प्रयत्नांना यश आले. आणि २९ जून पासून हिवरखेड तेल्हारा मार्गे अकोला थेट बस सेवेचा शुभारंभ झाला.

माजी सरपंच संदीप इंगळे, अ. भा. ग्रामीण पत्रकार संघांचे तालुकाध्यक्ष अर्जुन खिरोडकार, माजी ग्रामीण जिल्हाध्यक्ष सुरज चौबे, मा. शहराध्यक्ष जितेश कारिया, अकोला जिल्हाध्यक्ष (प) धिरज बजाज इत्यादी मान्यवरांच्या हस्ते फित कापून, नारळ फोडून सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बस क्र. एम, एच ४० वाय ५३४८ या बसला हिरवी झेंडी दाखऊन बसफेरीचा शुभारंभ करण्यात आला.

शुभारंभ प्रसंगी पत्रकार संघटना व उपस्थित मान्यवरांतर्फे बसचे चालक व वाहक यांचा शॉल श्रीफळ हरार्पण करून सत्कार करण्यात आला. यावेळी वाहतूक नियंत्रक सौ. सुप्रिया इंगळे, व्यापारी संघटनेचे अतिश मदनलाल बजाज, आनंद अग्रवाल, प्राचार्य अरुण हागे, सागर उरकडे, अझहर खान, उमेश इंगळे, पत्रकार, प्रवासी, व्यापारी, आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्या हस्ते बसचे पूजन आणि हरार्पण करण्यात आले.

# गांधी चौकात हवेमुळे पोस्टर फाटले



प्रतिनिधी ३० जून

**अकोला :** शहरातील गांधी चौकात मुख्य सोनचाफा बिल्डिंगच्या वरच्या मजल्यावर लावलेले पोस्टर सोमवारी सायंकाळी हवेमुळे फाटले. आता ते अधांतरी असून कधीही पडू शकते. एखाद्याच्या अंगावर पडून अपघात होऊ शकतो. त्यामुळे हा फलक तेथून काढावा अशी मागणी केली जात आहे.

# जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट येथे 'प्रवेशोत्सव' साजरा

प्रतिनिधी ३० जून



**आलेगाव :** येथील 'जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट' मध्ये नवीन शैक्षणिक सत्र २०२६-२७ ची सुरुवात अत्यंत उत्साहात आणि आनंददायी वातावरणात 'प्रवेशोत्सव' साजरा करून करण्यात आली. शाळेच्या पहिल्याच दिवशी नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना शालेय प्रवाहात सामावून घेण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**गुलाबपुष्प, चॉकलेट आणि औक्षण करून स्वागत**

भारतीय संस्कृती आणि परंपरेचे जतन करत, शाळेत पाऊल ठेवणाऱ्या नवीन चिमुकल्यांचे कुंकुमतिलक लावून आणि औक्षण करून स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ आणि चॉकलेट्स देऊन त्यांचा उत्साह वाढवण्यात आला. पहिल्याच दिवशी मिळालेल्या या आपुलकीच्या स्वागतामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद ओसंडून वाहत होता.

**मान्यवरांची उपस्थिती :** हा सोहळा शाळेचे अध्यक्ष अक्षय जैन, मुख्याध्यापक महावीर जैन, पर्यवेक्षक चंदा मुर्तडकर आणि परीक्षक नीलकंठ पस्तापुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यासह गुलाबपुष्प देऊन त्यांचे विद्यालयात स्वागत करण्यात आले.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन :** ?सदर प्रवेशोत्सव कार्यक्रम अकोला जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी रतन सिंग पवार सर, पातूरचे गटशिक्षणाधिकारी प्रवीण डाबेराव सर, शिक्षण विस्तार अधिकारी, तसेच आलेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख श्रीनिवास चव्हाण सर यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली झाला.

# गुरुकुल नगरी येथे आज संत वासुदेव महाराज पालखीचे आगमन

प्रतिनिधी ३० जून

**अकोला :** श्रद्धासागर अकोट ते पंढरपुर निघालेल्या गुरुमाऊली संत वासुदेव महाराज पालखीचे दिं ३० जुन रोजी सायं ७वा. गुरुकुल नगरी मलकापुर येथे आगमन होत असुन गुरुकुल नगरी कोठारी वाटी का परिसरात आनंदाचे वातावरण आहे.



माऊलींच्या पालखीचे आगमन झाल्या नंतर दुर्गा हाईटजवळ गुरुकुल नगरी येथे भावीक भकतांना संत वासुदेव महाराज पालखीचे दर्शन घेता येईल. नंतर पालखी धारक व भावीक भक्तांना अल्पोहाराचे वितरण करण्यात येईल.नंतर पालखीचा रात्रीचा मुक्काम श्री हनुमान मंदीर संस्थान गुरुकुल नगरी येथे असेल. श्री श्रीधर टिकार यांच्याकडुन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी परिसरातील नागरीकांनी मोठ्या संखेने पालखी दर्शन व महाप्रसाहाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226
मॉ. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार
वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

पत्ता : मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790,9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. ३० जून २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## ऑटो-दुचाकीची धडक : एक ठार; आठ जण जखमी

प्रतिनिधी ३० जून

**दिग्रस :** दारव्हा मार्गावरील हरसूल-गांधीनगर रस्त्यावर सोमवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास ऑटो आणि दुचाकीची समोरासमोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात मोख येथील महादेवराव वऱ्हाडे यांचा जागीच मृत्यू झाला, तर आठ जण जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मोख येथून दिग्रसकडे येणारा ऑटो आणि दिग्रसहून दारव्हा दिशेने जाणारी दुचाकी यांच्यात हरसूल-गांधीनगर मार्गावर समोरासमोर धडक झाली. धडक इतकी भीषण होती की दुचाकीस्वार महादेवराव वऱ्हाडे यांचा मृत्यू झाला.

अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू करत जखमींना दिग्रस ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. जखमींवर वैद्यकीय उपचार सुरू असून, त्यांच्या प्रकृतीबाबत अधिक माहिती अद्याप मिळालेली नाही.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# हुंड्याच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

### पतीसह पाच जणांविरोधात गुन्हा : आनंदनगर येथील घटना

प्रतिनिधी

**महागाव :** हिवरा संगम परिसरातील आनंदनगर येथील साक्षी शिवा जाधव (वय २५) हिने कथित हुंड्याच्या छळाला कंटाळून विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. या प्रकरणी तिचे वडील सुरेश जेता राठोड यांच्या तक्रारीवरून पतीसह सासरच्या पाच जणांविरोधात महागाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साक्षीचा विवाह पाच वर्षांपूर्वी आनंदनगर येथील शिवा श्यामराव जाधव याच्याशी झाला होता. विवाहावेळी रोख रक्कम, सोने-चांदी तसेच संसारोपयोगी साहित्य देण्यात आले होते. मात्र, विवाहानंतर हुंडा कमी दिल्याचे कारण पुढे करून पती व सासरच्या मंडळींकडून वारंवार पैशांची व सोन्याची मागणी करण्यात येत होती. त्यातून तिचा मानसिक व शारीरिक छळ केला जात असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

साक्षीला तीन वर्षांची मुलगी आणि दीड वर्षांचा मुलगा आहे. माहेरहून पैसे आणण्यासाठी तिच्यावर सातत्याने दबाव टाकण्यात येत होता. तसेच मारहाण व शिवीगाळ करून त्रास दिला जात असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

घटनेच्या आदल्या दिवशी तिने शेजाऱ्याच्या मोबाईलवरून वडिलांशी संपर्क साधून सासरकडून होत असलेल्या छळाची माहिती दिली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी तिने आत्महत्या केल्याची माहिती मिळताच कुटुंबीयांनी घटनास्थळी धाव घेतली असता ती विहिरीत मृतावस्थेत आढळून आली. या प्रकरणी पती शिवा श्यामराव जाधव, दीर विलास श्यामराव जाधव, सासरे श्यामराव जाधव, सासू रेणुका श्यामराव जाधव आणि जाऊ शीतल विलास जाधव यांच्याविरोधात आत्महत्येस प्रवृत्त करणे व हुंडाबळीशी संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण




निर्माण झाल्याने राखीव पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांच्या उपस्थितीत मृतदेह शवविच्छेदनासाठी सवना ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला. पुढील तपास महागाव पोलिस करीत आहेत.

## खाजगी शिक्षण संस्थांच्या प्रश्नांवर १ जुलैला बैठक

प्रतिनिधी ३० जून

**यवतमाळ :** महाराष्ट्र शासनाच्या विविध धोरणांमुळे राज्यातील खाजगी शिक्षण संस्थांवर होत असलेल्या प्रशासकीय, आर्थिक आणि धोरणात्मक अन्यायाच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्हा खाजगी शिक्षण संस्था संचालक मंडळाची तातडीची बैठक बुधवार, १ जुलै रोजी दुपारी २ वाजता दारव्हा रोडवरील हाऊसिंग फायनान्स कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे.

**पुढील आंदोलनाची दिशा ठरणार**

या बैठकीत 'पवित्र पोर्टल'मधील विविध अडचणी, वेतनेतर अनुदान वितरणातील विलंब, तसेच शासनाच्या विविध निर्णयांमुळे शिक्षण संस्थांसमोर निर्माण झालेल्या समस्यांवर सविस्तर चर्चा होणार आहे. शिक्षण क्षेत्रावर होत असलेल्या अन्यायाविरोधात पुढील भूमिका निश्चित करण्यावरही विचारमंथन करण्यात येणार आहे. याशिवाय, शासनाकडे शिक्षण संस्थांच्या न्याय्य मागण्या प्रभावीपणे मांडणे, आवश्यक असल्यास आंदोलनाची दिशा ठरविणे आणि त्यासाठी कृती आराखडा तयार करणे, यासंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जाणार आहेत.

सदर विषय अत्यंत गंभीर स्वरूपाचा असल्याने जिल्ह्यातील सर्व शिक्षण संस्था चालक, संचालक, मुख्याध्यापक आणि संबंधित पदाधिकाऱ्यांनी बैठकीला वेळेवर उपस्थित राहून आपली मते व सूचना मांडाव्यात, असे आवाहन अध्यक्ष गणेश मोरे, सचिव अनिल गायकवाड आणि उपाध्यक्ष जयंत घोंगे यांनी केले.

## शिवसेनेत प्रवेशानंतर साहेबराव कांबळे यांचा काँग्रेसवर आरोपांचा भडिमार

प्रतिनिधी ३० जून




**उमरखेड :** काँग्रेसमधून निष्कासनानंतर शिवसेनेत प्रवेश केलेले नेते साहेबराव कांबळे यांनी सोमवारी उमरखेड येथे आयोजित पत्रकार परिषदेत काँग्रेस नेतृत्वावर गंभीर आरोप केले. आपण स्वेच्छेने पक्ष सोडला नसून कोणतीही नोटीस न देता निष्कासित करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

मुंबईत शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर प्रथमच उमरखेड येथे आगमन झालेल्या कांबळे यांचे माहेश्वरी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि वसंतराव नाईक चौक येथे शिवसैनिक व नागरिकांनी स्वागत केले. शहरातून मिरवणूक काढण्यात आल्यानंतर त्यांच्या निवासस्थानी सत्कार सोहळा पार पडला. त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेतली.

कांबळे म्हणाले, "उमरखेडमधील काँग्रेस संघटनेला मी बळ दिले. मात्र, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत विरोधकांपेक्षा पक्षातील काही नेत्यांनीच माझा पराभव घडवून आणला. हिंमत असेल तर त्यांनी समोर येऊन चर्चा करावी."

विधान परिषद निवडणुकीतील उमेदवारी मागे घेण्याबाबत बोलताना त्यांनी मतदारसंख्येबाबत चुकीची माहिती देण्यात आल्याचा आरोप केला. पक्षाच्या प्रतिष्ठेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता, मात्र प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात आल्यानंतर उमेदवारी मागे घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या प्रक्रियेत कोणताही आर्थिक व्यवहार अथवा वैयक्तिक स्वार्थ नसल्याचा दावाही त्यांनी केला.

"मी किती कोटी रुपये घेतले, असा आरोप करणाऱ्यांनी आधी स्वतःचा हिशोब जनतेसमोर मांडावा. मला बोलण्यास भाग पाडू नये, अन्यथा अनेकांना उत्तर देणे कठीण जाईल," असा इशारा त्यांनी दिला.

शिवसेनेत प्रवेशामागे कोणत्याही पदाची किंवा लाभाची अपेक्षा नसल्याचे सांगत उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघात पक्ष संघटना मजबूत करण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले. "गाव तिथे शिवसेनेची शाखा" हा संकल्प पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचेही ते म्हणाले. या पत्रकार परिषदेला शिवसेनेचे संपर्कप्रमुख चितांगराव कदम, तालुकाप्रमुख प्रवीण पाटील मिराशे, संतोष जाधव, कपिल चव्हाण, शहरप्रमुख ॲड. संजीव जाधव, रविकांत रुडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

**काँग्रेसची प्रतिक्रिया अद्याप नाही**

■ साहेबराव कांबळे यांनी केलेल्या आरोपांवर काँग्रेसकडून अद्याप अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही. त्यामुळे याबाबत पक्ष नेतृत्व काय स्पष्टीकरण देते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## एसटी बसवर फलक नसल्याने प्रवाशांची गैरसोय; पुसद आगाराविरोधात नाराजी

प्रतिनिधी ३० जून




**दारव्हा :** पुसद आगाराच्या काही एसटी बसगाड्यांवर मार्गदर्शक फलक नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याचा आरोप बहुजन मुक्ती पार्टीचे यवतमाळ-वाशीम लोकसभा प्रतिनिधी बिमोद मुधाने यांनी केला आहे. दारव्हा बस स्थानकावरील एका घटनेनंतर त्यांनी आगार प्रशासनाकडे नाराजी व्यक्त केली.

मुधाने यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी दुपारी एमएच ४० वाय ५३२० क्रमांकाची पुसद-दारव्हा-अमरावती बस स्थानकावर उभी होती. मात्र, गाडीवर अमरावतीचा अधिकृत फलक नसून समोरील काचेवर खडूने मार्गाचे नाव लिहिण्यात आले होते. त्यामुळे प्रवाशांना गाडीचा मार्ग ओळखण्यात अडचणी निर्माण झाल्याचा दावा त्यांनी केला.

याबाबत चालकाकडे विचारणा केली असता, आगारात आवश्यक फलक उपलब्ध नसल्याचे उत्तर मिळाल्याचे मुधाने यांनी सांगितले. पावसाळ्यात खडूने लिहिलेली माहिती पुसली जाण्याची शक्यता असल्याने प्रवाशांची अधिक गैरसोय होऊ शकते, अशी प्रतिक्रिया काही प्रवाशांनी व्यक्त केली.

पुसद आगार प्रशासनाने सर्व बसगाड्यांवर अधिकृत मार्गदर्शक फलक लावून प्रवाशांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

दरम्यान, या आरोपांबाबत आगार प्रशासनाची भूमिका समजू शकलेली नाही.

## संत सावता माळी पतसंस्थेच्या संचालकपदी केशवराव खासबागे

प्रतिनिधी ३० जून



**पुसद :** संत सावता माळी नागरी सहकारी पतसंस्था, पुसदच्या संचालक मंडळावरील रिक्त जागेसाठी वाशीम शाखेचे स्थानिक समिती अध्यक्ष केशवराव खासबागे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांच्या आदेशानुसार २९ जून रोजी यासंदर्भात विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पुसद कार्यालयाचे सहकार अधिकारी वर्ग-२ चेतन राठोड यांनी अध्यासी अधिकारी म्हणून कामकाज पाहिले.

पतसंस्थेचे संस्थापक तथा अध्यक्ष आत्माराम जाधव, उपाध्यक्ष रतिराव बोरगडे, ज्येष्ठ तज्ज्ञ संचालक वसंतराव निरपासे व संचालक मंडळाच्या उपस्थितीत झालेल्या सभेत केशवराव खासबागे यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

निवडीनंतर अध्यक्ष आत्माराम जाधव, उपाध्यक्ष रतिराव बोरगडे, तज्ज्ञ संचालक वसंतराव निरपासे, अविनाश घावडे, दत्तात्रेय मोरे, मुरलीधर जाधव, गंगाराम काळे, प्रकाश गोरे, संजय भोने, गजानन इंगळे, पांडुरंग खांडरे, आनंदराव खंदारे, प्रा. दीपक वाघ व विनोद इंगळे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी बोलताना केशवराव खासबागे यांनी वाशीम जिल्ह्यातील शाखांसह पतसंस्थेच्या सर्व शाखांच्या प्रगतीसाठी अहोरात्र प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. संचालक मंडळाने दाखविलेल्या विश्वासाबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले. सहकार क्षेत्रातील अनुभवी व अभ्यासू व्यक्तीची संचालकपदी निवड झाल्याने यवतमाळ व वाशीम जिल्ह्यातील सभासद आणि ठेविदारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## फटाके वाजविणाऱ्या बुलेट वाहनांवर कारवाई

प्रतिनिधी ३० जून

**यवतमाळ :** शहरातील रस्त्यांवर बुलेट मोटारसायकलींचे मॉडिफाईड सायलेंसर लावून फटाक्यांसारखा आवाज करणाऱ्या वाहनचालकांविरोधात यवतमाळ शहर पोलिसांनी धडक कारवाई केली. नागरिक व व्यापाऱ्यांकडून सातत्याने येणाऱ्या तक्रारींची दखल घेत डीबी पथकाने ही मोहीम राबविली.

यवतमाळ शहर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाला रात्रीच्या गस्तीदरम्यान काही युवक बुलेट वाहनांचे सायलेंसर बदलून रस्त्यांवर मोठ्या आवाजात फटाके फोडत असल्याची माहिती मिळाली होती. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने पोलिसांनी तातडीने कारवाईचा निर्णय घेतला.

ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र बारड यांच्या सूचनेनुसार डीबी पथकाने शहरातील विविध चौकांमध्ये सापळा रचून संबंधित वाहनधारकांवर कारवाई केली. कारवाईदरम्यान एका बुलेट चालकाकडे वाहनाची आवश्यक कागदपत्रे नसल्याचे आढळून आल्याने वाहन ताब्यात घेऊन मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात आली.

मॉडिफाईड सायलेंसर लावून ध्वनीप्रदूषण करणाऱ्या वाहनचालकांवर यापुढेही सातत्याने कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. वाहनधारकांनी मूळ कंपनीचे सायलेंसरच वापरावेत, असे आवाहनही करण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल कोळी आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र बारड यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाचे पोउपनि गणेश सपकाळ व सहकाऱ्यांनी केली.

## जनतेच्या मनावर अधिराज्य करणारे जननायक - मा.ना.श्री.संजयभाऊ राठोड



जाते. असंख्य गरजू रुग्णांना उपचार, आर्थिक मदत आणि योग्य वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देत त्यांनी समाजसेवेचा वेगळाच आदर्श निर्माण केला आहे. त्याचबरोबर नेत्रतपासणी शिबिरे, आरोग्य तपासणी, स्त्रीरोग निदान शिबिरे, रक्तदान शिबिरे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, कुपोषित बालकांना पोषण आहार, दिव्यांगांना चारचाकी सायकली, रुग्णांना फळवाटप, वृक्षारोपण, सांस्कृतिक उपक्रम आणि सामाजिक बांधिलकी जपणारे अनेक उपक्रम त्यांनी सातत्याने राबविले आहेत.

कोरोना महामारीच्या अभूतपूर्व संकटातही संजयभाऊंनी समाजसेवेची ज्योत अखंड तेवत ठेवली. अन्नछत्र, आर्थिक मदत, ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरची उपलब्धता, कोविड केंद्रांची उभारणी, रुग्णांना पोषक आहाराचे वितरण आणि स्वतः रुग्णांची भेट घेऊन त्यांना मानसिक आधार देण्याचे कार्य त्यांनी अत्यंत निस्वार्थ भावनेने केले. संकटाच्या काळात लोकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे नेतृत्व म्हणून त्यांनी समाजाच्या मनात अढळ स्थान निर्माण केले.

**■ राजकारणात पदामुळे मोठेपणा मिळत नाही; तर जनतेच्या मनात निर्माण झालेल्या विश्वासामुळे नेतृत्व अमर होते. मा. ना. श्री. संजयभाऊ राठोड यांनी आपल्या साध्या, संवेदनशील आणि जनतेशी नाळ जोडलेल्या कार्यशैलीमुळे हे स्थान मिळवले आहे. श्रीमंत असो वा सामान्य, प्रत्येकाशी समान आपुलकीने वागणे, रुग्णांची सेवा करणे, अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे उभे राहणे आणि समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचविण्याची तळमळ ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख आहे.**

सार्वजनिक जीवनात लोकप्रिय नेतृत्वावर टीका आणि आरोप होणे ही नवी बाब नाही. संजयभाऊंवरही वेळोवेळी आरोप झाले; मात्र निष्पक्ष चौकशी व्हावी आणि लोकशाही मूल्यांवर जनतेचा विश्वास कायम राहावा, या उदात्त भावनेतून त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा देत नैतिकतेचा आदर्श घालून दिला. सत्य आणि न्यायावर असलेला त्यांचा विश्वासच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची अधोरेखित करतो.

स्वार्थापेक्षा समाजहिताला प्राधान्य देणारी वृत्ती, सर्वांना सोबत घेऊन चालण्याची समजूतदार शैली, कार्यकर्त्यांशी जिव्हाळ्याचे नाते आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांप्रती असलेली संवेदनशीलता यामुळे संजयभाऊ राठोड यांनी जनतेच्या मनावर कायमस्वरूपी अधिराज्य निर्माण केले आहे. शेतकरी, कामगार, युवक, महिला आणि वंचित घटकांच्या विकासासाठी त्यांनी केलेले कार्य त्यांच्या नेतृत्वाला अधिक लोकाभिमुख बनवते.

जनतेने दिलेला विश्वास हेच आपले सर्वात मोठे बळ मानणाऱ्या संजयभाऊंनी सत्तेत असो वा विरोधात, जनतेच्या प्रश्नांसाठी कधीही तडजोड केली नाही. सत्तेबाहेर असताना शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी मोर्चे, आंदोलने आणि संघर्ष उभारला; तर सत्तेत आल्यानंतरही लोकहिताच्या प्रश्नांवर शासनाकडे ठामपणे पाठपुरावा करून विकासाला गती दिली. जनतेप्रती असलेली वचनबद्धता हा त्यांच्या राजकीय प्रवासाचा केंद्रबिंदू राहिला आहे.

"रुग्णसेवक" ही त्यांची ओळख आज संपूर्ण महाराष्ट्रात आदराने घेतली



: लेखक :
संदीप प्रकाश रत्नपारखी
मो. ९८२२६३२८८८

आजही हजारो नागरिकांच्या आशा-अपेक्षांचे केंद्रबिंदू असलेले संजयभाऊ राठोड हे विकास, सेवा आणि जनविश्वास यांचे प्रतीक बनले आहेत. त्यांची समाजसेवेची अखंड वाटचाल अशीच सुरू राहो, त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अधिकाधिक लोकसेवा करण्याचे बळ लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

## पेट्रोल पंपाचा इंधन पुरवठा बंद करा, अन्यथा तीव्र आंदोलन; शिवसेनेचा इशारा

प्रतिनिधी ३० जून




**उमरखेड :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला अडथळा ठरत असल्याचा आरोप असलेल्या भारत पेट्रोलियमच्या पेट्रोल पंपाचा पेट्रोल व डिझेल पुरवठा तात्काळ बंद करून विक्री थांबवावी, अशी मागणी शिवसेना (शिंदे) पदाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे सोमवारी निवेदनाद्वारे केली.

निवेदनात म्हटले आहे की, संबंधित पेट्रोल पंप हटविण्यासाठी यापूर्वी अनेकदा शासनाकडे निवेदने देण्यात आली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि भूमी अभिलेख विभागाच्या मोजणीत पेट्रोल पंपाचे अतिक्रमण स्पष्ट झाल्याचा दावा करण्यात आला असून, या मोजणीविरोधात पेट्रोल पंप चालकाने कोणतेही अपील किंवा पुनर्विलोकन अर्ज दाखल केलेला नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी यापूर्वी या संदर्भात अहवाल दिला होता. मात्र, आता प्रशासन पूर्वीच्या भूमिकेपासून मागे हटत असल्याचा आरोपही शिवसेनेने केला आहे. दरम्यान, पेट्रोल पंप हटविण्याच्या मागणीसाठी सरोज देशमुख या गेल्या पाच दिवसांपासून आमरण उपोषण करत असून त्यांची प्रकृती खालावत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे नव्याने मोजणी करण्याऐवजी पूर्वीच्या अहवालाच्या आधारे तातडीने कारवाई करून पेट्रोल पंप हटविण्याची मागणी करण्यात आली आहे. पेट्रोल पंपामुळे परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने संबंधित पंपाचा इंधन पुरवठा त्वरित बंद करण्याचे आदेश द्यावेत. अन्यथा शिवसेना तीव्र आंदोलन छेडेल आणि त्यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीस शासन व प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. यावेळी संपर्कप्रमुख चितांगराव कदम, साहेबराव कांबळे, तालुका प्रमुख प्रवीण पाटील मिराशे, संतोष जाधव, ॲड. संजीवकुमार जाधव, रविकांत रुडे, कैलास कदम, बसवेश्वर शिरसागर, शेख इरफान शेख मुसा, राहुल वानखेडे, लक्ष्मीकांत गंगात्रे, सूर्यभान दळवी, माधवराव मोरे, भारत राठोड, संजय भालेराव, पप्पू शिंदे यांच्यासह शिवसेना (शिंदे) पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

५
# सिटी न्यूज अमरावती
मंगळवार, दि. ३० जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## ग्रामीण भागात कलम ३७(१) व(३) लागू

**अमरावती:** जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती यांच्या क्षेत्रात महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१) व(३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

सदर प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात लागू करण्यात आला असून दि. २९ जून ते १३ जुलै २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे अपर जिल्हादंडाधिकारी संतोष काकडे यांनी कळविले आहे.

# राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा अमरावतीत शुभारंभ

### ♦ ३० जूनपासून ५ दिवस चालणार घरोघरी मोहीम

प्रतिनिधी ३० जून



**अमरावती:** जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा नुकताच शुभारंभ करण्यात आला आहे. अकोला परिमंडळाचे आरोग्य सेवा उपसंचालक तथा अमरावती जिल्ह्याचे राज्यस्तरीय समन्वय अधिकारी डॉ. सुशीलकुमार वाकचौरे यांच्या हस्ते बालकाला पोलिओचा डोस पाजून या देशव्यापी मोहिमेची अधिकृत सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप हेडाऊ, अधिसेविका ललिता अटाळकर, जिल्हास्तरीय पर्यवेक्षक अधिकारी यांच्यासह रुग्णालयीन अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय आणि नगरपरिषद कार्यक्षेत्रामध्ये या मोहिमेचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले असून, यासाठी एकूण २२८ लसीकरण बूथ कार्यान्वित करण्यात आले आहेत. दि. २८ जून रोजी बूथ स्तरावर ० ते ५ वर्ष वयोगटातील बालकांना पोलिओचा डोस देण्यात आला असून, मोहिमेच्या पुढील टप्प्यात दि. ३० जून ते ४ जुलै २०२६ या पाच दिवसांच्या कालावधीत विशेष पथकांद्वारे घरोघरी जाऊन उर्वरित सर्व बालकांचा शोध घेतला जाणार आहे. या ५ दिवसांत एकही बालक डोस मिळण्यापासून वंचित राहू नये यासाठी आरोग्य यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली असून, जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आणि पालकांनी आपल्या ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओचा डोस पाजून आपल्या पाल्याला या गंभीर आजारापासून सुरक्षित करावे, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी केले आहे.

# ग्रामीण पोलीस दलात ११ महिन्यांच्या प्रशिक्षणाची संधी

### ♦ आज मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी रोजगार मेळावा

प्रतिनिधी ३० जून

**अमरावती:** नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित तरुण-तरुणींना आपले कौशल्य वाढवण्याची आणि शासकीय विभागात कामाचा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि पोलीस अधीक्षक (ग्रामीण) कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या, ३० जून २०२६ रोजी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी रोजगार मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून अमरावती ग्रामीण पोलीस विभागाच्या आस्थापनेअंतर्गत ११ महिन्यांच्या कार्य प्रशिक्षणासाठी पात्र उमेदवारांची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे केली जाणार आहे. हा मेळावा डेपो रोडवरील शासकीय तांत्रिक विद्यालय परिसरातील जिल्हा कौशल्य विकास केंद्रात आयोजित केला आहे. यासाठी वय किमान १८ ते ३५ वर्षे आणि शैक्षणिक पात्रता १२ वी पास, आयटीआय, पदविका, पदवीधर किंवा पदव्युत्तर उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. सध्या शिक्षण सुरू असलेले उमेदवार यासाठी पात्र नसतील. इच्छुक उमेदवारांनी 'म्स्ब्ळ्ज' संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी तसेच बँक खाते आधार संलग्न असणे अनिवार्य आहे. पात्र उमेदवारांनी ३० जून रोजी स्वतःच्या खर्चाने बायोडाटा, फोटो व मूळ कागदपत्रांसह प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी ०७२१-२५६६०६६ या क्रमांकावर संपर्क साधावा. जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त यांनी केले आहे.

# एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांना 'झेड' सुरक्षा द्या

### ♦ अमोल ठाकरे यांचे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री व पंतप्रधानांना निवेदन

प्रतिनिधी ३० जून



**अमरावती :** महाराष्ट्राचे अन्न व औषध प्रशासन एफडीए आयुक्त तुकाराम मुंडे यांना झेड' सुरक्षा प्रदान करण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक अमोल एन. ठाकरे यांनी अमरावती जिल्हाधिका ऱ्यांमार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, तुकाराम मुंडे यांनी एफडीएचा पदभार स्वीकारल्यानंतर भेसळयुक्त दूध, दुग्धजन्य पदार्थ, बनावट औषधे, प्रतिबंधित गुटखा, सुगंधी तंबाखू तसेच निकृष्ट दर्जाच्या उत्पादनांवर कठोर कारवाई केली आहे. या कारवाईमुळे विविध माफिया टोळ्यांकडून त्यांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

अमोल ठाकरे यांनी आपल्या निवेदनात अमरावती महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त गुंडेवार यांच्या कार्यकाळाचाही उल्लेख करत, भ्रष्टाचाराविरोधातील कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांचे संरक्षण करणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे नमूद केले आहे.

निवेदनानुसार, तुकाराम मुंडे यांना झेड सुरक्षा देण्यासाठी राज्यभरातील युवक-युवती, गणेशोत्सव मंडळे, दुर्गोत्सव मंडळे, विद्यार्थी संघटना आणि सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री यांना पोस्टकार्ड व पत्र पाठविण्याचे राज्यव्यापी अभियान सुरू करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.

याशिवाय, राज्यात दुधाळ जनावरांची संख्या तुलनेने कमी असतानाही मोठ्या प्रमाणात दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा पुरवठा कसा होतो, हा संशोधनाचा विषय असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सध्या या निवेदनावर शासनाकडून कोणती भूमिका घेतली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अमरावती शहर गुन्हे शाखा मार्फत घातक शस्त्र बाळगुण दहशत निर्माण करणाऱ्या इसमावर धडक कार्यवाही

प्रतिनिधी ३० जून




**अमरावती :** पोलीस आयुक्त यांनी अमरावती शहरा मध्ये अवैध्यरित्या घातक शस्त्र बाळगुण दहशत निर्माण करणाऱ्या इसमांवर धाडी टाकुण योग्य प्रभावी कार्यवाही करण्याबाबतचे आदेश प्राप्त झाले वरून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांचे नेतृत्वात पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

आर्म ॲक्ट कार्यवाही २९/०६/२०२६ रोजी गुन्हे शाखेच्या पथकास गोपनिय बातमीदारा मार्फत माहीती मिळाली कि, कपीलवास्तु नगर येथे राहणारा इसम नामे प्रफुल उर्फ दादू वानखडे हा त्याच्या हाताध्ये दोन लोखंडी चाकू घेवुन लक्ष्मी नगर रोड येथे धामधुम करूण दहशत पसरवित आहे. वरूण सदर ठिकाणी गुन्हे शाखेचे पथक तातळीने जावुन पाहणी केली असता. एक इसमास हा हाता मध्ये दोन लाखंडी घातक चाकु घेवुन येणा-या जाणा-या लोकांना चाकु दाखवुन दहशत पसरविताना दिसुन आला त्यास गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफीने ताब्यात घेवुन त्याचे हाता मधिल दोन लोखंडी चाकु कि.अ. २,०००/- रू जप्त करून त्यांचे विरूध्द पो.स्टे. गाडगे नगर येथे कलम ४/२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ मपोको प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव प्रफुल उर्फ दादु सागर वानखडे वय २४, रा. कपीलवास्तु नगर, अमरावती. असे आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या मुददेमाल: दोन लोखंडी चाकु कि.अ. २,०००/- रू जप्त करण्यात आला.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके (परिमंडळ ०१), पोलीस उपायुक्त श्याम घुगे (परिमंडळ ०२), पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ मुख्यालय (गुन्हे), (गुन्हे), सपोआ शिवाजी बचाटे (गुन (गुन्हे शाखा) यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पो. नि. अतुल वर, पो.नि. दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात सपोनि. महेश इंगोले, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार सुनिल लासुरकर, दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तिक देशमुख, मनोज ठोसर, मंगेश परिमल, सचिन बहाळे, जहीर शेख, मिर्झा नईम बेग, अतुल संभे, चालक संदीप खंडारे, राहुल दुधे यांनी केली आहे.

# सामान्य नागरिकांना, विधान भवनात प्रवेश हवा असेल तर द्यावे लागेल आमदारांचे पत्र

### ♦ मुख्य प्रवेशद्वारावर कडक पोलीस बंदोबस्त



प्रतिनिधी ३० जून

**अमरावती :** सामान्य नागरिकांना पावसाळी अधिवेशनामध्ये विधान भवनामध्ये प्रवेश हवा असेल तर पास काढण्यासाठी संबंधित आमदारांचे पत्र द्यावे लागते. त्यासाठी विधानभवनाच्या बाहेर प्रवेश पास नोंदणी कक्ष तयार करण्यात आले असून हा नोंदणी कक्ष अत्याधुनिक आहे. या ठिकाणी संबंधितांना पास देण्यात येत आहे. तसेच ज्या ठिकाणाहून मंत्री आमदार, व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांची एन्ट्री होते. त्या मुख्य प्रवेशद्वारावर पोलिसांचा कडक पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे. या ठिकाणी हे स्थळ सतत सीसीटीव्ही कॅमेरा च्या नजरेत असते. अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्यातील पहिला दिवस चांगलाच गाजला. राज्यातील अनेक आमदारांनी महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा केली. विरोधकांनी सुद्धा सत्ताधाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.

# राज्यात वणव्यामुळे दुर्मिळ वनस्पती व वन्यजीवांचे मोठ्या प्रमाणात नुकसान-आ.संजय खोडके

### ♦ तेंदूपत्ता संकलनाच्या काळात काही असामाजिक तत्वांकडून जंगलांना आग लावण्याचे प्रकार

प्रतिनिधी ३० जून



**अमरावती:** राज्यातील सुमारे १२ हजार ००३ हेक्टर वनक्षेत्र आगीच्या विळख्यात सापडले असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे. वणव्याच्या घटनेमुळे वनसंपदा तसेच वन्यजीवांचे मोठे नुकसान झाले आहे. तेंदूपत्ता संकलनाच्या काळात काही असामाजिक तत्वांकडून जंगलांना जाणीवपूर्वक आग लावून वनसंपत्तीला हानी पोहोचविली जात असून शासनाने ठोस उपाययोजनांची मागणी विधानपरिषद आमदार संजय खोडके यांनी राज्यविधीमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात लावून धरली.

आमदार संजय खोडके यांनी सांगितले कि, राज्यातील १६ हजार ००८ वणव्याच्या घटनेमुळे वनसंपदेला मोठा फटका बसला असून सुमारे १२ हजार ००३ हेक्टर वनक्षेत्र आगीच्या विळख्यात सापडले असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, जंगलात पेटणारा वणवा हि नैसर्गिक घटना नसून जंगलांमध्ये मानवनिर्मित वणव्याच्या घटनेत वाढ होत आहे.जंगलातील वणवा पसरत जात असल्याने हजारो वृक्ष, दुर्मिळ वनस्पती तसेच शेकडो वन्यजीवांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने जंगलातील वनसंपदा , अधिवास व जैवविविधता धोक्यात आली आहे. तसेच शेतकऱ्यांच्या शेती-पिकांचे व शेतमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याची बाब सुद्धा आमदार संजय खोडके यांनी सभागृहाच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच वन परिक्षेत्रात तेंदूपत्ता संकलनाच्या काळात वणवा पेटत असल्याने मजुरांना सुद्धा रोजगारासाठी स्थानांतर वाढले आहे. वनसंरक्षण संदर्भात प्रादेशिक वन विभाग आणि वन्यजीव विभाग असे दोन भाग आहे. त्यामुळे या दोन्ही विभागांमध्ये समन्वय निर्माण करून वणव्याच्या घटनांवर प्रभावी नियंत्रण मिळविणे शक्य होणार असल्याचे सांगून दोन्ही विभागांनी संयुक्तपणे काम करून वणव्याच्या घटना रोखण्यासाठी विशेष कृती आराखडा तयार करावा, अशी मागणीही त्यांनी केली. अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागतील वनक्षेत्रात वाढत्या वणवा व नुकसानीच्या घटनाबाबत शासन गंभीर नसल्याचा बाबत सुद्धा आ.खोडके यांनी नाराजी व्यक्त केली.

त्यामुळे राज्यातील जंगलभागातील वणवा आटोक्यात आणण्यासाठी कुठल्या उपाययोजना करण्यात आल्या ? वारंवार लागणाऱ्या वणव्यांमुळे होणारे पर्यावरणीय व वन्यजीवांचे नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली? तसेच जंगलातील वणव्यास जबाबदार आणि जाणीवपूर्वक वणवे लावणाऱ्या असामाजिक तत्वांवर कारवाई करणार का ? असा प्रश्न आ.संजय खोडके यांनी उपस्थित करून याबाबत शासनाने खुलासा करण्याची मागणी सभागृहातून करण्यात आली.

# आयआयटी मद्रासकडून जिल्ह्यात 'डीडीएचआय' अंतर्गत रस्ता सुरक्षा प्रशिक्षण संपन्न

प्रतिनिधी ३० जून

**अमरावती :** जिल्ह्यातील रस्ता सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आयआयटी मद्रासच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर रोड सेफ्टी' तर्फे जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने विशेष रस्ता सुरक्षा प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'डीडीएचआय' उपक्रमांतर्गत हे एकदिवसीय प्रशिक्षण आज नियोजन भवन येथे संपन्न झाले. या प्रशिक्षणासाठी आयआयटी मद्रासचे प्रमुख प्रकल्प अधिकारी डॉ. रोशन जोस आणि प्रकल्प अभियंता प्रदीप कुमार एनव्हीके यांनी प्रशिक्षण दिले.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासनाने या प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले.यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता आर. वाय. पाटील कार्यकारी अभियंता प्रतिक गिरी यासह पोलीस, परिवहन, रस्ते विकास यंत्रणा, आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या सत्रामध्ये वर्गखोली प्रशिक्षणाद्वारे डीडीएचआय आणि एफपीएस ॲप्लिकेशन्स, रस्त्यावरील धोके ओळखणे, अहवाल यंत्रणा आणि विविध विभागांच्या जबाबदाऱ्या यावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळवून देण्यासाठी ट्रॉमा केअर आणि आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसादावर विशेष चर्चा करण्यात आली.

अमरावतीमधील रस्त्यांचे जाळे अधिक सुरक्षित करण्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरेल, असा विश्वास जिल्हा प्रशासनाच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

# 'आम्ही समतावादी' अभियानाला अमरावती जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

### ♦ वटसावित्रीनिमित्त महिलांशी समतेचा संवाद, वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

प्रतिनिधी ३० जून

**अमरावती :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महाराष्ट्र राज्य महिला सहभाग विभागांतर्गत अमरावती जिल्हा महिला सहभाग विभाग यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या ठआम्ही समतावादीठ अभियानांतर्गत वटसावित्री निमित्त अमरावती शहर, बडनेरा, दर्यापूर तसेच विविध भागांत महिलांशी प्रत्यक्ष संवाद, पर्यावरण जनजागृती आणि वृक्षारोपणाचे उपक्रम उत्साहात पार पडले. श्रद्धेचा आदर राखत समता, वैज्ञानिक दृष्टिकोन, स्त्री-पुरुष समानता, आरोग्य जागरूकता आणि पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश या अभियानातून देण्यात आला.

संपूर्ण अभियानाचे मार्गदर्शन अमरावती जिल्हा महिला सहभाग विभागाच्या जिल्हा कार्यवाह विजया करोले यांनी केले. तसेच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल मंदा श्रीधर, जिल्हा प्रधान सचिव विजय डवरे तसेच अमरावती जिल्ह्यातील सर्व शाखांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला सहभाग विभागाच्या सदस्यांचे मोलाचे मार्गदर्शन, सहकार्य व सक्रिय सहभाग लाभला.

अभियानादरम्यान महिलांशी संवाद साधताना वटसावित्री व्रतामागील भावनेचा आदर व्यक्त करत वडाच्या वृक्षाचे पर्यावरणीय, सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व पटवून देण्यात आले. केवळ पूजा न करता वडासह इतर वृक्षांचे संवर्धन व वृक्षारोपण करणे ही काळाची गरज असल्याचा संदेश देण्यात आला. अनेक ठिकाणी वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाची प्रत्यक्ष कृतीही करण्यात आली.



यावेळी पती-पत्नीमधील परस्पर सन्मान, घरकामातील समान सहभाग, कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत महिलांचा समान अधिकार, संविधानाने दिलेली समानतेची मूल्ये तसेच परंपरा आणि आधुनिक वैज्ञानिक विचार यांची सांगड या विषयांवर महिलांशी मुक्त संवाद साधण्यात आला. उपवास करणाऱ्या महिलांनी पुरेसे पाणी पिणे, संतुलित आहार घेणे व स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे मार्गदर्शनही करण्यात आले.

बडनेरा शाखेच्या वतीने मोनाली सदावर्ते यांच्या समन्वयातून आयोजित कार्यक्रमात पूजा दिहाडे, दिव्या पाडवार, संगीता पाडवार, शुभांगी पाडवार, शुभांगी झंझाड, वंदना झंझाड, पूजा झंझाड, रीना झंझाड, वंदना लेंडे, शीतल वैद्य, पंचफुला पाडवार, वर्षा खराबे, वनमाला झंझाड, चंद्रकला पाडवार आणि निर्मला किंडरळे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

अमरावती शाखेच्या वतीने कांचन रुपुने यांनी महिलांशी समता, आरोग्य आणि पर्यावरण या विषयांवर प्रभावी संवाद साधला. दर्यापूर शाखेच्या वतीने स्वाती चोंडके यांनी महिलांशी संवाद साधत समता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.अमरावती शहरातील अंबादेवी, बुधवारा आणि हनुमान नगर परिसरात जिल्हा महिला सहभाग विभागाच्या कार्यवाह विजया करोले यांच्या नेतृत्वाखाली महिलांशी प्रत्यक्ष संवाद साधून समता, आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि संविधानिक मूल्यांविषयी जनजागृती करण्यात आली. या सर्व उपक्रमांमध्ये विविध भागांतील मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग घेतला. श्रद्धेला धक्का न लावता समतेचा विचार मांडण्याच्या या अभियानाचे महिलांनी मनापासून स्वागत केले. परंपरेसोबत वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण संरक्षण आणि स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे ही काळाची गरज असल्याचे मत सहभागी महिलांनी व्यक्त केले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या ठआम्ही समतावादीठ अभियानाच्या माध्यमातून अमरावती जिल्ह्यात महिलांमध्ये संविधानिक मूल्ये, वैज्ञानिक दृष्टिकोन, पर्यावरण संवर्धन आणि स्त्री-पुरुष समानतेबाबत सातत्याने जनजागृती सुरू असून, हा जिल्हास्तरीय उपक्रम त्याच दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
मंगळवार दि ३० जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




# तुकाराम मुंढे साहेबांचा...

# शिस्त, कडक नियम व कायदा, भ्रष्टअधिकाऱ्यांचा वसुलीचा फायदा !


**अतिष देशमुख @ वाशीम**

तुकाराम मुंढे हे शिस्त, कडक, नियम व कायद्यासाठी प्रसिध्द आहेत. ज्या विभागात गेले त्या विभागात ते कायद्याने काम करून सर्वसामान्यांचा फायदा करतात मात्र, अकोला - वाशीम जिल्ह्यात त्यांच्या याच गोष्टीचा फायदा घेत भ्रष्टअधिकाऱ्यांनी कारवाईच्या नावाखाली छोट्या दुकानदारांकडून लूट सुरू केली आहे. यासाठी दलालही नेमले आहेत. अकोला - वाशीम जिल्ह्यात अन्न व प्रशासन विभागाने एकही ठोस मोठी कारवाई न करता निव्वळ वसुलीचाच धंदा सुरू केला आहे. महाराष्ट्रभर अन्न व औषध प्रशासन (इँ) विभागाकडून भेसळयुक्त अन्नपदार्थ, अवैध गुटखा विक्री आणि मेडिकलमधील अनियमिततेविरोधात तुकाराम मुंढे यांनी धडक मोहीम सुरू केली आहे. राज्यभरात कारवायाचा धडाका सुरू आहे. मात्र भ्रष्टाचाराने बरबटून पोखरून वाळवी लागलेल्या वाशीमच्या अन्न व प्रशासन विभागाच्या कारवाया कमी वसुलीच जास्त सुरू आहे. राज्यभरातील तुकाराम मुंढे यांच्या कारवायामुळे माफियांनी धास्ती घेतली असून अनेकांची मस्ती उतरली आहे. याच गोष्टीचा फायदा घेत भ्रष्टअधिकाऱ्यांनी तिप्पट चौपट वसुली सुरू केली आहे. यासाठी खासगी दलालही नेमले आहेत. दिखावा म्हणून डमी कारवाया करून मॅनेजची हमी दिल्या जात आहे. त्यामुळे अशा भ्रष्टअधिकाऱ्यावरही कारवाई करण्याची गरज आहे.

## *मोठ्या माफियांना सूट, छोट्या दुकानदाराकडून लूट * छोटे - मोठे अशी फूट





कडक शिस्त आणि प्रामाणिक कारभारासाठी ओळख असलेल्या तुकाराम मुंढे यांच्या नावामुळे जनतेमध्येही आता व्यवस्था बदलेल, अशी अपेक्षा निर्माण झाली आहे.मात्र, याच मोहिमेच्या आड काही ठिकाणी वेगळाच खेळ सुरू असल्याचे आरोप आता समोर येत आहेत. कारवाईच्या नावाखाली काही अधिकारी-कर्मचारी आपलीच खासगी वसुलीची 'व्यवस्था' मजबूत करत असल्याची चर्चा रंगत आहे. मुंढे साहेबांच्या कडक प्रतिमेचा आधार घेऊन जर कुणी स्वतःचे आर्थिक गणित जुळवत असेल, तर हा प्रकार अत्यंत गंभीर आहे.तपासणीपूर्वीच माहिती पोहोचते का? काही ठिकाणी कारवाई फक्त कागदावरच होते का? भेसळ करणारे आणि नियम मोडणारे लोक वारंवार वाचतात कसे? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.अन्नपदार्थांच्या तपासणीपासून गुटखा विक्रीपर्यंत जर यंत्रणेतील काही घटक आणि अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये संगनमत असेल, तर हा थेट जनतेच्या आरोग्याशी खेळ आहे. कारण भेसळयुक्त अन्नाचा फटका सामान्य नागरिकांना बसतो, तर गैरप्रकार करणारे मात्र मोकाट फिरतात.गुटखा विक्रीवर कारवाईचे आदेश निघतात, धाडींची चर्चा होते; पण काही ठिकाणी कारवाईपूर्वीच हालचाली थांबतात, अशी चर्चा का होते? याचे उत्तर प्रशासनाने शोधण्याची वेळ आली आहे.मोठमोठ्या घोषणा, धडक मोहिमा आणि प्रसिद्धीपेक्षा आता गरज आहे ती प्रत्यक्ष परिणामांची. दोषींवर कठोर कारवाई झाली नाही तर अशा मोहिमा फक्त कागदावरच राहतील.मुंढे साहेब, तुमच्या नावावर जर कुणी यंत्रणेचा गैरफायदा घेत असेल, तर त्या प्रवृत्तीला आळा घालणे आवश्यक आहे. प्रामाणिक अधिकाऱ्यांच्या प्रतिमेचा वापर करून जर भ्रष्टाचाराला खतपाणी मिळत असेल, तर ही संपूर्ण व्यवस्थेची हार ठरेल. अकोला- वाशीम बुलढाणा जिल्ह्यातील भ्रष्ट अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्यांनी कारवाई करण्याऐवजी तुकाराम मुंढे यांच्या नावावर मोठ्या माफियांना सोडून छोट्या दुकानदाराकडून व मेडीकल वाल्यांकडून दलालामार्फत थेट वसुली सूरू केली आहे. हे दलाल खासगी असून यांचे अधिकाऱ्यांची थेट संबंध आहेत. त्यामुळे तुकाराम मुंढे यांच्या नावाचा गैरवापर करून भ्रष्टाचार करणाऱ्या अशा भ्रष्टअधिकाऱ्यांवरही कारवाई करावी त्यांच्या मालमत्तेची चौकशी करावी त्यांच्या कामाचा मागील लेखाजोखा तपासावा त्यामुळे सत्य समोर येवून भ्रष्टअधिकारी उघडे पडतील. व छोट्या दुकानदारांना त्रास होणार नाही.

---

## थोडक्यात

### सौरऊर्जेमुळे वीजबिलात मोठी बचत

**पात्र ग्राहकांना तब्बल ९५ टक्क्यांपर्यंत अनुदान**

**सिटी न्युज ब्युरो @ वाशीम**

स्वच्छ, हरित आणि शाश्वत ऊर्जेचा वापर वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि महावितरण यांच्या माध्यमातून 'स्मार्ट योजना २०२५' अंतर्गत विशेष छतावरील सौरऊर्जा (रूफटॉप सोलर) योजना राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या 'पीएम सूर्यघर : मोफत वीज योजना' अंतर्गत ही योजना कार्यान्वित असून, पात्र घरगुती वीज ग्राहकांना १ किलोवॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे.या योजनेमुळे घरगुती वीजबिलात लक्षणीय बचत होण्याबरोबरच स्वच्छ ऊर्जेचा वापर, ऊर्जा स्वयंपूर्णता आणि अतिरिक्त वीज निर्मितीद्वारे उत्पन्नाची संधी उपलब्ध होणार आहे. पर्यावरणपूरक जीवनशैलीला चालना देत हरित महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने ही योजना महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

योजनेअंतर्गत १ किलोवॅट क्षमतेच्या रूफटॉप सोलर प्रणालीसाठी केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान दिले जाणार आहे. बीपीएल लाभार्थ्यांना एकूण ४७ हजार ५०० रुपये, अनुसूचित जाती-जमातीच्या लाभार्थ्यांना ४५ हजार रुपये, तर सर्वसाधारण व इतर मागासवर्गीय लाभार्थ्यांना ४० हजार रुपये अनुदान देण्यात येणार असून, उर्वरित रक्कम ग्राहकांना भरावी लागणार आहे.

### कर्जमुक्तीची नवी पहाट बळीराजाला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' योजनेचा भक्कम आधार

**सिटी न्युज ब्युरो @ वाशीम**

शेती आणि निसर्गाचं नातं तसं लहरीच. कधी अस्मानी संकट, कधी सुलतानी अडचण, तर कधी बाजारपेठेतील चढ-उतार... या सगळ्याशी दोन हात करताना आपला शेतकरी राजा पार खचून जातो. त्यातच कर्जाचा वाढता डोंगर त्याच्या प्रगतीच्या आड येतो. अशा कठीण परिस्थितीत वाशिम जिल्ह्यासहित संपूर्ण महाराष्ट्रातील बळीराजाला पुन्हा एकदा मानाने उभं करण्यासाठी राज्य शासनाची 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' एक आशेचा नवा किरण ठरत आहे.

**विचारांचा वारसा, कृतीतून साकार**

प्रजेच्या कल्याणालाच आपलं सर्वस्व मानणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी राज्यकारभाराची प्रेरणा घेऊन ही योजना सुरू करण्यात आली आहे. केवळ कोरडी आर्थिक मदत न करता, शेतकऱ्याच्या पाठीवर मायेचा हात ठेवून त्याला शेतीसाठी नवी ऊर्जा देणे, हा या योजनेचा प्रामाणिक हेतू आहे.

**कर्जाच्या चक्रव्यूहातून सुटका**

कर्जाचा बोजा फक्त आर्थिक नसतो, तर तो शेतकऱ्याचं मानसिक बळही खचवून टाकतो. कर्जफेडीची चिंता, नवीन पीककर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणी यामुळे शेतकरी नवीन प्रयोग करायला घाबरतो. पण या योजनेमुळे हा अडथळा दूर झाला आहे. कर्जमुक्ती मिळाल्यामुळे शेतकऱ्यांची बँकिंग व्यवस्थेतील पत सुधारली असून, पुढच्या हंगामासाठी त्यांना ताठ कण्याने आणि नव्या उमेदीने शेती करण्याची संधी मिळाली आहे.

**पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाचा मेळ**

कोणतीही शासकीय योजना म्हटली की कागदपत्रांचा खच आणि हेलपाटे आलेच, हा आजवरचा अनुभव. मात्र, या योजनेने हे चित्र बदलले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन आणि पारदर्शक करण्यात आली आहे. प्रशासन, सहकार विभाग आणि बँकांच्या उत्तम समन्वयामुळे वाशिम जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांपर्यंत या योजनेचा लाभ कोणतीही दिरंगाई न होता थेट पोहोचत आहे.

**आत्मविश्वासाची नवी उडी**

कर्जमुक्तीमुळे केवळ पैसे माफ झाले नाहीत, तर शेतकऱ्यांचा गमावलेला आत्मविश्वास परत आला आहे. चिंतेतून मुक्त झालेला शेतकरी आता आधुनिक तंत्रज्ञान शिकू लागला आहे.

---

**सिटी न्यूज सुपरफास्ट, बातमी खास, दखल हमखास...**

# अखेर कोल्हापुरी बंधारा झाला मोकळा !

**सिटी न्युज ब्युरो @ रिसोड**




रविवार दि २८ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
बाभळीच्या झाडांनी कोल्हापुरी बंधारा जाम; पुलासह गावालाही धोका !
पिंप्री सरहद्द येथील प्रकार

रिसोड तालुक्यातील पिंप्री सरहद्द येथील कांचन नदीवरील कोल्हापुरी बंधाऱ्यात महापुरानंतर मोठ्या प्रमाणात बाभळीची झाडे, फुरसण व इतर कचरा अडकून पाण्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्णपणे विस्कळीत झाला होता. त्यामुळे पाण्याचा दाब वाढून पूल, रस्ता तसेच गावालाही धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत होती. या गंभीर परिस्थितीमुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या गंभीर प्रश्नाकडे 'सिटी न्यूज सुपरफास्ट' ने दि. २८ जून रोजी 'बाभळीच्या झाडांनी कोल्हापुरी बंधारा जाम; पुलासह गावालाही धोका!' या ठळक मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. या वृत्ताची तात्काळ दखल घेत संबंधित यंत्रणेने बंधाऱ्यात अडकलेली बाभळीची झाडे, फुरसण व इतर अडथळे हटविण्याची मोहीम राबवली.या कारवाईमुळे बंधाऱ्यातील पाण्याचा प्रवाह पुन्हा सुरळीत झाला असून संभाव्य पूरस्थिती आणि मोठ्या दुर्घटनेचा धोका मोठ्या प्रमाणात टळला आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त करत प्रशासनाने वेळेवर केलेल्या कारवाईचे स्वागत केले आहे. ग्रामस्थांनी 'सिटी न्यूज सुपरफास्ट'चेही आभार मानत, लोकहिताचा प्रश्न प्रभावीपणे मांडल्यामुळे प्रशासनाला तातडीने कारवाई करावी लागली, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

मात्र, भविष्यात अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये यासाठी प्रत्येक पावसाळ्यापूर्वी कोल्हापुरी बंधाऱ्यांची नियमित स्वच्छता, नदीपात्रातील झाडे व गाळ हटविणे, तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याची मागणीही नागरिकांनी केली आहे.सध्या पावसाळा सुरू असून पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा अंदाज लक्षात घेता नदीपात्र, बंधारे व पुलांची सातत्याने पाहणी करून आवश्यक ती खबरदारी घेणे अत्यावश्यक असल्याचेही नागरिकांनी प्रशासनाला आवाहन केले आहे.

# खासगी शाळांच्या विरोधात 'आमआदमी' आक्रमक !

**सिटी न्युज ब्युरो @ वाशीम**

खासगी शाळा व महाविद्यालयांकडून अचानक करण्यात येणाऱ्या वाढीव शुल्क आकारणीविरोधात आम आदमी पार्टीचे वाशिम शहराध्यक्ष मनोज मारोतीनाथ शिंदे यांनी राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सध्याच्या शैक्षणिक वर्षात अनेक खासगी शिक्षण संस्थांनी मोठ्या प्रमाणात शुल्कवाढ केली असून, सामान्य पालकांना हे शुल्क भरणे आर्थिकदृष्ट्या कठीण होत आहे. काही संस्थांकडून शुल्क न भरल्यास विद्यार्थ्यांचा प्रवेश, परीक्षा प्रक्रिया किंवा शैक्षणिक हक्क रोखण्याचे प्रकार होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.शुल्कवाढीची चौकशी करून शासनाच्या नियमांनुसार कारवाई करावी, पालकांना हप्त्यांमध्ये शुल्क भरण्याची सुविधा द्यावी, तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची खबरदारी घ्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

तसेच काही शाळांमध्ये पावती न देता शुल्क आकारणी किंवा इतर संस्थांच्या नावावर पैसे घेण्याच्या प्रकारांची चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे.विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी तातडीने योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा आपच्या वाशिम शहराध्यक्ष मनोज शिंदे यांनी व्यक्त केली आहे.

---

**नगर 'सेवक' नव्हे ; खरा जन 'सेवक'...**

# ना निधी, ना विधी, काम आधी !

**सिटी न्युज ब्युरो @ वाशीम**



नगरसेवक युवा नेते गल्ला भाऊ उर्फ सतीश वानखेडे हे जनसेवेच्या माध्यमातून राजकारण करीत आहेत.दररोज सकाळी आपल्या वार्डात व शहरात फिरून नागरिकांच्या अडचणी समजून घेत आहेत. नगर सेवक होवूनही ६ महिने झाले आहेत. अद्यापही वार्डात शासनाचा निधी उपलब्ध झाला नाही. तरी सुध्दा गल्लाभाऊ यांनी काम आधी करून विकासाला सुरूवात केली आहे.

गल्लाभाऊ वानखेडे हे वार्डात नाल्या साफ करणे, स्वच्छतेच्या समस्या, नळ आली की नाही, पाणी मिळाले की नाही, मोफत टँकरने पाणीपुरवठा करणे भर उन्हाळ्यात झाडे लावले, रस्त्यावर लाईट लागली की नाही, ह्या सर्व मूलभूत सुविधा कडे गल्लाभाऊ स्वतः लक्ष देत आहेत. प्रत्येक नागरिकाजवळ जाऊन ते थेट विचारतात, 'काय काम आहे? कोणती अडचण आहे?' तुमची तब्येत कशी आहे कोणाला दवाखान्यात जायचे आहे का?आणि त्यावर तात्काळ उपाय करण्याचा प्रयत्न करतात.

निवडणुकीसाठी नाही तर समाजसेवेसाठी गल्लाभाऊ रोज नागरिकांना भेटत असून त्यांच्या समस्या ऐकून घेत आहेत. लोकसेवा ही केवळ निवडणुकीपुरती नसून ती सातत्याने केली पाहिजे, याचा गल्लाभाऊ वानखेडे यांनी घालून दिला आहे. त्यामुळेच आज वार्डातील व शहरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, गल्लाभाऊ वानखेडे यांच्याकडे खऱ्या अर्थाने जनतेसाठी काम करणारा नगरसेवक म्हणून पाहिले जात आहे. त्यामुळे ती निवडणूक झाल्यावर निवडणुकीपुरते नव्हे तर खरे जनसेवक बनत आहेत. ते आता स्व-खर्चाने नाल्या साफ करून वार्डाची स्वच्छता करीत आहेत.

# लाईनमनची बदली अन् गाव अंधारात !

## इंजिनिअर तायडे यांनी स्वतः फील्डवर फिरून सुरळीत केला वीजपुरवठा

**सिटी न्युज ब्युरो @ रिसोड**

कुकसा व पिंपरी सरहद्द या गावांमध्ये गेल्या दोन ते चार दिवसांपासून वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत होता. कधी वीज पूर्णपणे बंद तर कधी फॉल्टमुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते.

### पिंप्री सरहद्द गावकऱ्यांची एकच मागणी - आमचा लाईनमन आढाव परत द्या...

गेल्या काही दिवसांपासून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे पिंपरी सरहद्द व कुकसा येथील ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. तात्कालीन लाईनमन आढाव यांच्या बदलीनंतर वीजपुरवठ्याच्या समस्या वाढल्याचा दावा ग्रामस्थांनी केला असून, 'आमचा लाईनमन परत ,' अशी एकमुखी मागणी त्यांनी महावितरणकडे केली आहे.



दरम्यान, या भागात कार्यरत असलेले कर्तव्यदक्ष लाईनमन आढाव यांची मांगुळ येथे बदली झाल्यानंतर कुकसा व पिंपरी सरहद्द या भागासाठी कायमस्वरूपी लाईनमन उपलब्ध नसल्याने देखभालीच्या कामावर परिणाम झाल्याची चर्चा गावकऱ्यांमध्ये आहे.याबाबत केनवड सबस्टेशनचे इंजिनिअर तायडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी, 'सध्या संबंधित लाईनमन आपापल्या फीडवर कार्यरत असल्यामुळे येथे तातडीने कर्मचारी उपलब्ध नाही. मात्र नागरिकांनी चिंता करू नये, मी स्वतः येऊन फॉल्ट तपासतो,' असे आश्वासन दिले. आपल्या शब्दाप्रमाणे इंजिनिअर तायडे यांनी स्वतः फीडवर जाऊन संपूर्ण लाईनची पाहणी केली. फॉल्ट शोधून तात्काळ दुरुस्ती करण्यात आली आणि कुकसा व पिंपरी सरहद्द गावांचा विद्युत पुरवठा पुन्हा सुरळीत करण्यात आला. त्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत त्यांच्या तत्परतेचे कौतुक केले.

मात्र, गावकऱ्यांनी एकमुखाने मागणी केली की, 'आमचा पूर्वीचा लाईनमन परत द्या किंवा या भागासाठी कायमस्वरूपी लाईनमन नियुक्त करा. वीजपुरवठ्याच्या तक्रारींवर तातडीने प्रतिसाद मिळण्यासाठी स्थानिक कर्मचारी असणे अत्यावश्यक आहे.' स्थानिकांच्या या मागणीकडे महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देऊन कुकसा व पिंपरी सरहद्द परिसरासाठी कायमस्वरूपी लाईनमनची नियुक्ती करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

# पुरावे समोर; कारवाई मात्र शून्य, आरोग्य विभागाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह

**सिटी न्युज ब्युरो @ केनवड**





आरोग्य विभागाचा भोंगळ कारभार !
सोमवार दि २१ जून २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम Express
जैविक कचरा जाळतात मोक्यात, नागरिकांचे आरोग्य धोक्यात !


सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
केनवडात नागरिकांच्या जीवाशी खेळ...
दवाखान्यासमोरच जैविक कचरा जाळण्याचा मेळ!
शनिवार दि २७ जून २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम Express
घोटे डॉक्टरांचा प्रताप भारी, परवाना आहे म्हणे घरी !
रविवार दि २८ जून २०२६
दवाखान्याचे नाव, ठिकाण पुरावे सर्व काही स्पष्ट, तरीही कारवाई शू...

केनवड येथील खासगी दवाखान्यासमोर घातक जैविक वैद्यकीय कचऱ्याची अयोग्य विल्हेवाट लावली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. दवाखान्याचे नाव, ठिकाण, छायाचित्रे आणि घटनास्थळावरील परिस्थिती समोर आल्यानंतरही संबंधित यंत्रणेकडून ठोस कारवाई झाल्याचे दिसून येत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या प्रकरणाबाबत सिटी न्यूज सुपरफास्टने वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर संबंधित ठिकाणावरील कचरा हटवण्यात आल्याचे दिसून आले. मात्र नियमभंग झाला का, चौकशी करण्यात आली का, संबंधितांना नोटीस देण्यात आली का किंवा कायदेशीर कारवाई झाली का, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

दवाखान्याचे नाव, ठिकाण आणि पुरावे समोर असतानाही कारवाईला झालेला विलंब पाहता 'पुरावे असूनही कारवाई का झाली नाही?' असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जाहीर करावी आणि नियमभंग

**प्रशासन 'कोमात' तर तस्कर 'जोमात'**

# मानोरा तालुक्यात वृक्षांची कत्तल

**सिटी न्युज ब्युरो @ मानोरा**



तालुक्यातील सह अनेक गावातील आडजात झाडे वनतस्कर शेतकऱ्यांच्या धुर्यावरील विकत घेऊन विना परवानगी हिरवी कच्च झाडाची राजरोस पणे कत्तली सुरू असून याकडे वन विभागाचे अधिकारी वनपाल व वनरक्षक चिरीमिरी घेऊन याकडे दुर्लक्ष करतात.

एकी कडे शासन वृक्षारोपण करीत असताना मानोरा परिसरात दररोज शेकडो वृक्षांची कत्तल होत असून दिवसा वृक्षांची कत्तल केल्या नंतर वाहनात लाकडे टाकून नेत असताना सुद्धा हया तस्करकडे कोणत्या अधिकाऱ्याचे लक्ष का नाही गेल्या तीन चार महिन्या पासून वृक्षांची कत्तल होत असताना तस्करवर कारवाई होत नसल्यामुळे वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज आहे. याकडे दुर्लक्ष केल्यास संपूर्ण झाडेच नामशेष होण्याची भीती निसर्ग प्रेमी कडून होत आहे काही जागरूक नागरिकांनी भ्रमणध्वनी वरून अधिकारी कर्मचारी यांना माहिती दिली किंवा शोशल मीडियाच्या माध्यमातून फोटो व माहिती पुरविली तर ती माहिती वनतस्कर ला पुरविली जाते व त्याला सावध करतात यावरून वृक्ष कटाई बाबत हे अधिकारी कर्मचारी किती जागरूक आहे हे समजून येते.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
मंगळवार, दि. ३० जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## बुलढाणा जिल्हा दूध उत्पादक सहकारी संघाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी मतदार यादी कार्यक्रम जाहीर

**बुलढाणा :** बुलढाणा जिल्हा दूध उत्पादक सहकारी संघ मर्यादित, बुलढाणा यांच्या सन २०२४-२५ या वर्षाच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी प्रारूप व अंतिम मतदार यादी तयार करण्याचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. जाहीर कार्यक्रमानुसार ३० जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्याच दिवशी मतदार यादीवर दावे व हरकती दाखल करण्यासाठी नोटीस बोर्डावर सूचना प्रसिद्ध केली जाईल. ३० जून ते २३ जुलै २०२६ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत दावे व हरकती स्वीकारल्या जातील. प्राप्त दावे व हरकतींवर २५ जुलै २०२६ रोजी निर्णय घेण्यात येईल. त्यानंतर ३१ जुलै २०२६ रोजी दुपारी १२ वाजता अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

# आणखी 20 दिवस कायम राहणार 10 टक्के भाडेवाढ

### ◆ एसटी प्रवाशांच्या खिशाला १५ जुलैपर्यंत कात्री

प्रतिनिधी ३० जून

**खामगाव:** उन्हाळी सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाने लागू केलेली १० टक्के परिवर्तनशील भाडेवाढ आणखी २० दिवस कायम राहाणार आहे. या भाडेवाढीची मुदत १५ जून २०२६ रोजी संपणार होती; मात्र महामंडळाने याला १५ जुलै २०२६च्या मध्यरात्रीपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ऐन दुष्काळी सावटात एसटी प्रवाशांच्या खिशाला कात्री लागणार आहे. सद्यःस्थितीत इंधनाच्या (डिझेल) दरात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. त्यामुळे एसटी महामंडळाचा एकूण परिचालन खर्च वाढल्याने अतिरिक्त आर्थिक लागत सोसावा भार आहे. महामंडळातर्फे शासनाकडे नियमित भाडेवाढीचा प्रस्ताव पाठवण्यात येणार आहे; परंतु या प्रक्रियेला काही कालावधी लागणार असल्याने तोपर्यंत ही १० टक्के तात्पुरती भाडेवाढ महिनाभरासाठी कायम ठेवण्यात आली आहे. ही भाडेवाढ प्रतिटप्पा मूळदर १०.०५ रुपये असून, १० टक्के वाढीसह तो आता ११.०५ रुपये प्रतिटप्पा असाच पुढे सुरू राहील.



**१५ जुलैनंतर प्रवाशांना दिलासा मिळण्याची शक्यता**

उन्हाळयाच्या सुट्टया, लग्नसराई यामुळे एसटी प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती. त्यामुळे महामंडळाच्या उत्पन्नात वाढ व्हावी, यासाठी एसटी महामंडळाकडून १५ एप्रिल ते १५ जून या दोन महिन्यांकरिता १० टक्के हंगामी प्रवास भाड्यांमध्ये वाढ करण्यात आली होती. १५ जून २०२६ रोजी या भाडेवाढीची मुदत संपणार होती; मात्र इंधनाची (डिझेल) दरवाढ झाली. त्यामुळे एसटी महामंडळाकडून १५ जुलैपर्यंत ही प्रवासी दरवाढ कायम ठेवण्यात आली आहे. त्यामुळे आता १५ जुलैनंतर प्रवाशांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

**प्रवाशांमध्ये नाराजीचा सूर**

एसटी महामंडळाकडून प्रवाशांना वेगवेगळ्या सवलती देण्यात येतात. सध्या महिलांना प्रवासभाड्यात ५० टक्के सूट देण्यात आली आहे. तसेच, इतरही ३५ प्रकारच्या प्रवाशांना सवलती देण्यात आल्या आहे. त्यामुळे प्रवासाकरिता नागरिकांकडून एसटीला पसंती दिली जात आहे. मात्र, आता ही हंगामी भाडेवाढ जुलैच्या मध्यापर्यंत कायम राहणार आहे

## अंतराळवीर अंगद प्रताप यांचे उद्या बुलढाण्यात व्याख्यान

प्रतिनिधी ३० जून

**बुलढाणा :** भारताच्या महत्वाकांक्षी मिशन गगनयान २०२६ साठी निवड झालेले अंतराळवीर ग्रुप कॅप्टन अंगद प्रताप यांचे बुधवार १ जुलै रोजी अरुणोत्सव अंतर्गत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास कर्नल सुहास जतकर (से.नि.), नगराध्यक्षा पुजाताई गायकवाड, कॅप्टन एम. महेंद्र कुमार, गर्दे वाचनालयाचे सचिव उदय देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

बुलढाणा येथे श्रीमती अरुणाताई कुल्ली यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'अरुणोत्सव' कार्यक्रमांतर्गत 'लढाऊ वैमानिकाचे मन-अंतराळवीराचे हृदय' या विषयावर गर्दे वाचनालय येथे सभागृह बुधवार १ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता व्याख्यान आयोजित केले आहे. यावेळी महिला व विधवा महिलांच्या पुर्नविवाहाची चळवळ प्रभावीपणे राबविणारे मानस फाऊंडेशनचे अध्यक्ष दत्तात्रय लहाने यांच्या कार्याची दखल घेवून त्यांना 'अरुणाई' पुरस्काराने या सन्मानित करण्यात येणार आहे. बुलढाणेकर रसिकांना आणि विद्यार्थ्यांना ग्रुप कॅप्टन अंगद प्रतापयांचे सोबत संवाद साधता येणार आहे. हा कार्यक्रम सुजाता कुल्ली, अध्यक्ष व्रिक्ष फाउंडेशन तसेच प्रगती सार्वजनिक वाचनालय परिवार आणि भगतसिंग क्रीडा, शैक्षणिक आणि सांस्कृतिक मंडळ, बुलढाणा यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित केला आहे.

## शासनाच्या वेळ काढू धोरणाचा शिवसेना (उबाठा) कडून जाहीर निषेध

### ◆ उपविभागीय अधिकारी यांचे मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

प्रतिनिधी ३० जून

**मलकापुर:** टि इ टी चा पेपर फुटल्याने झालेले शैक्षणिक नुकसान व संबंधित अधिकारी यांना निलंबित करण्यात यावे तसेच पेपर फुटल्याची जबाबदारी निश्चित करून शिक्षण मंत्र्यांनी सुद्धा राजीनामा द्यावा अशी मागणी शिवसेना (उबाठा)च्या वतीने उपविभागीय कार्यकारी अधिकारी यांचे मार्फत मुख्यमंत्री यांना एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात नमूद केले आहे की या अगोदर सिटी चा पेपर कुठून विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते देशभरात आठ ते दहा विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या तर आता कालच टीईटीची परीक्षेचाही पेपर फुटल्याने शैक्षणिक नुकसान झाले असून याची जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकारी व शिक्षण मंत्री यांचे वर तातडीने कारवाई करण्याची व या दोन्ही पेपर फुटीचा शिवसेना तर्फे जाहीर निषेध करण्यात येत असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. निवेदनावर शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना शहर प्रमुख हरिदास गणबास, नगरसेवक रफिक भाई बर्तन वाले, किसान सेना उपतालुकाप्रमुख विश्वनाथ पुरकर, सुयोग शर्मा, वाहतूक सेना शहरप्रमुख इम्रान लकी, विभाग प्रमुख सत्तार शाह, रफिक भाई पजायवाले, शेख आसीफ शेख नजीर, शेख जलील शेख जलील, मो.जुबेर मो. जमील, राजीकखान मोहम्मद खान सह आदींच्या स्वाक्षऱ्या नमूद आहे.



## विवरा येथील जि.प ची शाळेची शिकस्त इमारत पाडण्याच्या कामाला सुरुवात

### ◆ नवीन दोन खोल्या बांधण्याच्या कामाला मंजुरात

प्रतिनिधी ३० जून

**मलकापुर:** तालुक्यातील विवरा येथील जिल्हा परिषद शाळेच्या खोल्या शीकस्त झाल्या असून न्यायाधीश शाळा पाहणी समितीने शाळा पाडणे बाबतचे पत्र दिले मात्र वर्षभरापासून सदर प्रकरण थंड बस्त्यात बसल्याने शिवसेना (उबाठा) पदाधिकाऱ्यांनी पंचायत समिती, बांधकाम विभाग जिल्हा परिषद यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केल्याने व या उन्हाळ्याच्या सुट्टीत जिर्ण झालेल्या खोल्या न पाडल्यास शिक्षक व विद्यार्थी यांच्या जिवाला धोका निर्माण झाल्याने विद्यार्थ्यांना शाळेत पाठविणार नसल्याचा इशारा शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास सह ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे दिला होता.शिवसेनेच्या आंदोलनाच्या धास्तीने त्या जीर्ण शाळा खोल्या बांधण्याच्या प्रस्तावाला जिल्हा परिषद बांधकाम विभागाने मंजुरी दिली, त्याबाबतचे पत्र दि. ११ जून २६ रोजी शिवसेना पदाधिकाऱ्यांना देण्यात आले होते. आज दि. २७ जून २६ रोजी जिल्हा परिषद बांधकाम विभागाने जेसीबीसह कर्मचाऱ्यांना पाठवून त्या जीर्ण झालेल्या शाळा खोल्या पाडण्याच्या कामाला सुरुवात केल्याने व लवकरच विद्यार्थ्यांना शाळेची नवीन इमारत बांधण्यात येणार असल्याने ग्रामस्थांनी शिवसेना पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.



## हतनूर धरणाचे २ दरवाजे अर्ध्या मिटरने उघडले

प्रतिनिधी ३० जून



**मलकापूर :** पुर्णा असलेल्या हतनूर धरणातील पाणीसाठा हा समाधानकारकरित्या वाढत चालला आहे. त्यामुळे हतनूर धरण सद्या ६६.३७ टक्के भरले आहे. त्यामुळे हतनूर धरणाचे बॅकवॉटर असलेल्या पाणी साठ्यामध्येही काही प्रमाणात वाढ झाली असल्याचे समोर आले आहे.

२८ जून रोजी हतनूर धरणाच्या प्रशासनाने जाहीर केलेल्या नोंदीनुसार धरणाची पाण्याची पातळी २११.५१० मीटर इतकी नोंदविण्यात आली आहे. धरणातील पाण्याचा ताण नियंत्रीत ठेवण्यासाठी धरणातील दोन रेडीअल गेटस् प्रत्येकी ०.५ मीटरने उघडण्यात आले आहेत. त्यामुळे ७२ क्युमेक्स (२५४३ क्युमेक्स) इतका विसर्ग करण्यात आला आहे. हतनूर धरणाची एकूण साठवण क्षमता २५७.५० दशलक्ष घनमीटर असून त्यापैकी १२४.५० दशलक्ष घनमीटर इतका उपयुक्त साठा आजरोजी उपलब्ध आहे. जो ४८.८२ टक्केपर्यंत आहे. धरणातील पुर्ण जलसाठा पातळी २१४.००० मीटर इतकी आहे. कालव्याद्वारे ०.७१ क्युमेक्स (२५ क्युमेक्स) इतका अल्प प्रमाणात पाणी सोडण्यात येत असून आरएस गेटस्द्वारे कोणताही विसर्ग सुरू नाही. २८ जून रोजी धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये ६ मीमी पावसाची नोंद करण्यात आली आहे. हंगामातील एकूण पर्जन्यमान ३४ मी. मी. पर्यंत पोहचले आहे. पावसाचा जोर असाच कायम राहिला तर हतनूर धरणातील पाणी साठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. हतनूर धरणामध्ये वाढलेले ६ टक्के पाण्याचे पातळीमुळे हतनूर धरणाच्या बॅकवॉटर असलेल्या श्रीक्षेत्र धुपेश्वर येथील पुर्णा नदी पात्रातही काही प्रमाणात पाण्याची पातळी वाढली असल्याचे सांगण्यात आले.

## वाड्यात गाय शिरल्याच्या कारणावरून महिलेला मारहाण

### ◆ दोघांविरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हा

प्रतिनिधी ३० जून

**नांदुरा:** घरासमोरील वाड्यात गाय शिरून कुटार खात असल्याचा जाब विचारल्याच्या कारणावरून पती-पत्नीने मिळून महिलेला काठीने मारहाण करून जखमी केल्याची घटना नांदुरा तालुक्यातील पलसोडा येथे घडली. याप्रकरणी नांदुरा पोलिसांनी आरोपी पती-पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सिद्धार्थ महादेव खांडेकर (वय ३३, रा. पलसोडा) हे खासगी चालक आहेत. २३ जूनला सकाळी सात वाजण्याच्या सुमारास त्यांचे काका देवराव कडू खांडेकर यांची गाय खांडेकर यांच्या घरासमोरील वाड्यात शिरून कुटार खात होती यावेळी सिद्धार्थ यांच्या आई मिराबाई खांडेकर यांनी गाय बांधून ठेवण्याबाबत सांगितल्याचा राग आल्याने दोन्ही कुटुंबांमध्ये वाद झाला. वादाचे पर्यवसान मारहाणीत झाले. आरोपी देवराव खांडेकर यांनी हातातील काठीने मिराबाई खांडेकर यांच्यावर वार करून त्यांना जखमी केले. तसेच आरोपींनी शिवीगाळ करीत जिवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

जखमी मिराबाई खांडेकर यांना प्रथम नांदुरा येथे नेण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारांसाठी खामगाव येथे रेफर करण्यात आले. याप्रकरणी २८ जूनला नांदुरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीवरून देवराव कडू खांडेकर व उखाबाई देवराव खांडेकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार दीपक सोळंके करीत आहेत.

## साखरखेर्डा परिसरात पाचव्या दिवशीही रिमझिम

### ◆ हळद लागवड यशस्वी, कपाशी लागवड सुरू

प्रतिनिधी ३० जून

**साखरखेर्डा :** गेल्या अनेक दिवसांपासून खंड पडलेल्या पावसाचे आगमन झाले असून सतत पाचव्या दिवशीही रिमझिम पावसाने हजेरी लावल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. हळद लागवड केलेल्या शेतकऱ्यांना हा पाऊस फायदेशीर ठरला आहे.

साखरखेर्डा परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने खंड दिला होता. आज येईल उद्या येईल या आशेवर चातक पक्षाप्रमाणे पावसाची आसधरून शेतकरी होते. गेल्या सोमवार पासून पावसाने हजेरी लावल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण आहे. पेरणी योग्य पाऊस पडेपर्यंत पेरणी करु नका असा सल्ला कृषी विभागाने दिला होता. त्यामुळे शेतकरी दमदार पावसाची प्रतीक्षा करीत असताना रविवारी रात्री रात्रभर रिमझिम पावसाने हजेरी लावल्याने शेतकरी पेरणीसाठी सरसावला आहे.

गेल्या दोन दिवसांपासून कपाशी लागवड करताना शेतकरी दिसत असून सोमवारी अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन पेरणीची लगबग सुरू केली आहे साखरखेर्डा भागात हळदीची लागवड मोठ्या प्रमाणात झालेली आहे. या पिकासाठी योग्य पाऊस पडला आहे. कृषी विभागाच्या वतीने अनेक शेतकऱ्यांना मोफत बियाणे वाटप करण्यात आले आहे. सतत पावसाने हजेरी लावल्याने शेतकरी पेरणीसाठी सरसावला आहे.

## दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने चाकू हल्ला!

प्रतिनिधी ३० जून

**खामगाव:** घाटपुरी नाका परिसरात दारू पिण्यासाठी पैसे मागण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना घडली. याप्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी अजय भगवान किरकाळे (३५, रा. घाटपुरी नाका, खामगाव) यांनी दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली. अनिरूद्ध भास्कर चंडाळने (रा. जोशीनगर, खामगाव) असे आरोपीचे नाव आहे. ही घटना २८ जूनच्या रात्री १०:०० वाजताच्या सुमारास घडली असून, त्यानंतर रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी व आरोपी हे एकमेकांना ओळखत असून, एकाच परिसरात वास्तव्यास आहेत. घटनेच्या वेळी फिर्यादी त्यांच्या मित्रांसोबत घाटपुरी नाका येथे उभे असताना आरोपीने दारू पिण्यासाठी पैसे मागितले. पैसे नसल्याचे सांगितल्यानंतर आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ केली आणि त्यानंतर जवळील चाकूने त्याच्या डाव्या हाताच्या बोटावर वार करून जखमी केले. याप्रकरणी वैद्यकीय अहवाल व फिर्यादीच्या तक्रारीच्या आधारे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस कर्मचारी वसतकर करीत आहेत.

## सरसकट कर्जमाफी करा
### किसान कॉंग्रेसचे निवेदन तहसिलदार

**संग्रामपूर:** सरसकट कर्जमाफीसह इतर मागण्या पूर्ण करा, अशी मागणी किसान कॉंग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे. तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या, यासाठी कोणत्याही अटी ठेवू नका. दोन वर्ष सतत नैसर्गिक आपत्ती येऊन गेल्याने शेतकरी प्रचंड आर्थिक अडचणीत आहेत म्हणून कर्जमाफी देणे आवश्यक आहे. मुलींसाठी स्वतंत्र बस व्यवस्था सुरू करून प्रत्येक खेड्यात महामंडळाची बस पोहोचवा. जन्म नोंदी अटी, नियम पिढी जात स्थानिक रहिवाशांसाठी शिथिल करण्यात याव्या. रखडलेली अनुदान रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात त्वरित जमा करा.

## दोन दुचाकींची समोरासमोर धडक; परस्परविरोधी तक्रारींवरून गुन्हा

### ◆ दोघे चालक जखमी : पोलिसांकडून तपास सुरू

प्रतिनिधी ३० जून

**मलकापूर :** नरवेल-मलकापूर मार्गावरील वळणावर दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन दोन्ही चालक जखमी झाल्याची घटना शनिवारी (दि.२७) दुपारी घडली. या अपघातानंतर दोन्ही पक्षांनी एकमेकांविरुद्ध निष्काळजीने वाहन चालविल्याचा आरोप करत स्वतंत्र तक्रारी दाखल केल्या. यावरून एमआयडीसी मलकापूर पोलिसांनी रविवारी (दि.२८) गुन्हा नोंदवला.

धरणगाव येथील सौरभ दिनकर पाटील (२८) हे दुचाकीने नरवेलकडे जात होते. त्याचवेळी पायल शैलेश राठी (२६ रा. चंदननगर, मलकापूर) या कामानिमित्त नरवेलहून दुचाकीवरून मलकापूरकडे येत होत्या. नरवेल गावाजवळील वळणावर दोन्ही भरधाव दुचाकींची समोरासमोर धडक झाली. या अपघातात पायल राठी यांच्या डाव्या हाताच्या अंगठ्याला फॅक्चर झाले असून, कपाळ, कंबर, पाय व पोटाला दुखापत झाली. तसेच त्यांच्या मोठ्या दुचाकीचे प्रमाणात नुकसान झाले. तर दुसरा दुचाकीचालक सौरभ पाटील यांच्या हाताला व पायाला गंभीर दुखापत झाली असून, त्यांच्याही दुचाकीचे नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी दोघांनाही तातडीने रुग्णालयात दाखल केले. उपचार घेतल्यानंतर दोघांनी परस्पर तक्रारी दाखल केल्या. तपास पोलिस निरीक्षक दीपक वारे यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे.

## तणनाशके वापरताना काळजी घ्या; कृषी विभागाचे आवाहन

### ◆ चुकीच्या वापरामुळे पिके, पर्यावरणाला धोका

प्रतिनिधी ३० जून

**खामगाव:** जिल्ह्यात पावसाला सुरुवात झाल्यानंतर खरीप पिकांची पेरणी वेगाने सुरू असून, उगवलेल्या पिकांमध्ये लवकरच तणनाशक फवारणीला सुरुवात होणार आहे. तणांचे प्रभावी नियंत्रण करून पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी तणनाशकांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात असला, तरी त्याचा अयोग्य वापर पिकांसह मानवी आरोग्य आणि पर्यावरणासाठी ही धोकादायक ठरू शकतो. त्यामुळे तणनाशकांचा वापर शास्त्रीय पद्धतीने आणि आवश्यक खबरदारी घेऊनच करावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

तणनाशकांची निवड करताना संबंधित पिकासाठी शिफारस केलेले औषधच वापरणे आवश्यक आहे. प्रत्येक तणनाशक विशिष्ट तण आणि पिकासाठी तयार केलेले असल्याने कृषी तज्ज्ञांचा सल्ला घेऊन किंवा औषधावरील लेबलवरील सूचनांनुसार त्याची निवड करावी. फवारणीपूर्वी लेबलवरील मात्रा, फवारणीची वेळ, पाण्याचे प्रमाण आणि सुरक्षा सूचना काळजीपूर्वक वाचून त्यांचे पालन करणे गरजेचे आहे.

**हवामानाचा विचार करणे महत्त्वाचे**

फवारणी करताना हवामानाचा ही विचार करणे तितकेच महत्त्वाचे आहे. जोरदार वारा असल्यास किंवा पावसाची शक्यता असल्यास फवारणी टाळावी. अन्यथा औषध शेजारच्या पिकांवर जाऊन नुकसान होण्याची किंवा पावसामुळे वाहून जाऊन अपेक्षित परिणाम न मिळण्याची शक्यता असते.

**सुरक्षा साधने आवश्यक**

तणनाशक फवारणी दरम्यान हातमोजे, मास्क, गॉगल, पूर्ण बाह्यांचे कपडे आणि बूट यासारखी वैयक्तिक सुरक्षा साधने वापरणे आवश्यक आहे. औषधाचा त्वचा, डोळे किंवा तोंडाशी संपर्क होणार नाही, याची काळजी घ्यावी. फवारणीनंतर हात, पाय धुवावेत.

**रिकाम्या बाटल्यांची सुरक्षित विल्हेवाट लावा**

फवारणी यंत्र स्वच्छ आणि सुस्थितीत असावे. योग्य नोजलचा वापर करून औषधाची समान फवारणी होईल, याची खात्री करावी. तणनाशकांचे रिकामे डबे किंवा बाटल्या शेतात, पाणवठ्याजवळ किंवा सार्वजनिक ठिकाणी फेकू नयेत. त्यांची सुरक्षित विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. तसेच तणनाशक नेहमी मूळ पॅकिंगमध्ये, थंड व कोरड्या ठिकाणी साठवावीत.

शिफारशीपेक्षा जास्त प्रमाणात तणनाशक वापरल्यास पिकांची वाढ खुंटणे, पाने जळणे किंवा उत्पादनात घट होण्याचा धोका वाढतो.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

मंगळवार, दि. ३० जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# सर्वच शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत

## गुलाब पुष्प देऊन तसेच टिळा लावून विद्यार्थ्यांचे स्वागत






प्रतिनिधी ३० जून

**अकोला :** उन्हाळ्याच्या सुट्ट्या नंतर आजपासून विदर्भातील शाळा पूर्ण जोमाने पुन्हा सुरू झाल्या आहेत. नवीन शैक्षणिक सत्र आज ३० जून रोजी सुरू झाले आहे. सुरुवातीला, शाळा २३ जून रोजी पुन्हा सुरू होणार होत्या, परंतु उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ही तारीख बदलण्यात आली. आता, सर्व शाळांमध्ये आजपासून नियमित वर्ग पुन्हा सुरू झाले आहेत. विद्यार्थी शाळेत जाण्यासाठी उत्साही आणि तयार दिसून आले तर शिक्षकही पूर्णपणे सज्ज होते. शिक्षण विभागाने सर्व शाळांना पहिल्या दिवसापासून





नियमित वर्ग पुन्हा सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून शैक्षणिक कामकाजात कोणताही व्यत्यय येणार नाही.

स्वागत दिन साजरा झाला

नवीन सत्राच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी विशेष तयारी करण्यात आली होती. अनेक शाळानी मुलांना गुलाबाची फुले देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. अनेक शाळांचे प्रवेशद्वार रंगीबेरंगी फुग्यांनी सजवण्यात आले होते. काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मिठाई आणि लहान भेटवस्तू देखील दिल्या गेल्या. मुलांमध्ये आपलेपणाची भावना



वाढवण्यासाठी आजचा दिवस 'स्वागत दिन' म्हणून उत्साहाने साजरा केला गेला. विशेषतः स्वावलंबी विद्यालय भारत विद्यालय माउंट कार्मेल बाल शिवाजी आदी शाळांमध्ये आणि शिक्षकांनी सोमवार पासूनच मुलांचे स्वागत करण्याची तयारी केली होती. सोमवारी, शाळा पुन्हा सुरू होण्याच्या एक दिवस आधी, शहरातील बाजारपेठांमध्ये मोठी गर्दी दिसून आली. पालक आपल्या मुलांसाठी दप्तरे, पुस्तके, वह्या आणि इतर गरजेच्या वस्तू खरेदी करताना दिसले. आज शाळेचा पहिला दिवस असल्याने मुलांमध्ये उत्साह दिसून आला बऱ्याच दिवसांनी जुने मित्र भेटल्याने विद्यार्थ्यांच्या गप्पा आनंदात सुरू होत्या अनेक विद्यार्थ्यांचे पालक त्यांना शाळेत सोडण्यासाठी आले होते.

### कोर्टाच्या निर्णयानंतर बदलली तारीख

उल्लेखनीय आहे की, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने विदर्भातील शाळांसंदर्भात एका महत्त्वपूर्ण निर्णयात शिक्षण विभागाचे पूर्वीचे आदेश रद्द केले आहेत. सुरुवातीला शाळा पुन्हा सुरू करण्याची तारीख १५ जून, नंतर २२ आणि २३ जून अशी निश्चित करण्यात आली होती, परंतु न्यायालयाने त्या फेटाळून लावल्या. न्यायालयाने स्पष्टपणे निर्देश दिले की विदर्भातील सर्व शाळा ३० जूनपासून पुन्हा सुरू झाल्या पाहिजेत. न्यायालयाने असेही म्हटले होते की विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य दिले पाहिजे.

### आम्ही सर्व विद्यार्थ्यांचे फुलांनी स्वागत करणार आहोत

आज, आम्ही सर्व विद्यार्थ्यांचे फुलांनी स्वागत केले. आमचा प्रयत्न आहे की मुलांनी पहिल्या दिवसापासूनच आनंददायी वातावरणात शाळेत यावे आणि वर्षभर उत्साहाने अभ्यास करावा. मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी परिसरातील सर्व नगरसेवक आणि नगरसेवकांनाही या प्रसंगी आमंत्रित करण्यात आले होते.

**- मुख्याध्यापक भारत विद्यालय**

### नियमित वर्ग सुरू होतील

तारखेबाबत संभ्रम होता, पण आता उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सर्व काही स्पष्ट झाले आहे. आम्ही आज पूर्ण तयारीने सत्राची सुरुवात करत आहोत आणि वर्ग नेहमीप्रमाणे सुरू राहतील. सर्व मुलांचे स्वागत गुलाब पुष्प देऊन आणि शंख वाजवून करण्यात आले. शाळेचा पहिला दिवस असल्याने मुलांमध्ये उत्साह दिसून आला

**मुख्याध्यापक स्वावलंबी विद्यालय**

# अंडरपास मध्ये शिरले पाणी

## ♦ मशीन द्वारे उपसा सुरू

प्रतिनिधी ३० जून



**अकोला :** प्रमिलाताई ओक सभागृह ते जनता भाजी बाजार दरम्यान झालेल्या अंडरपासचा उपयोग शहरवासिय कितपत करतात हा प्रश्न आहे. विविध कारणांमुळे अंडरपास चर्चेत राहतो. पावसाळ्यात तर यामध्ये पाणी भरलेले असते. दोन दिवसांपूर्वी शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे अंडरपास मध्ये पाणी शिरले. आणि आता मशीन द्वारे पाण्याचा उपसा केला जात आहे. अंडरपास मध्ये पाणी साचले की त्यातील पाणी गाड्या तसेच जनावरे धुण्यासाठी वापरले जाते. खरेतर रहदारी नियंत्रण हा अंडरपास निर्मिती मागील मुख्य उद्देश होता. दुचाकीस्वार तसेच पादचा-यांना प्रमिलाताई ओक स्मारक ते जनता भाजी बाजार पर्यंत पोहचणे सुलभ व्हावे हा मुख्य उद्देश होता. परंतु अंडरपास मधून महिला किंवा एकट्याने जाणे जोखमीचे आहे. त्यामुळे अंडरपासचा उपयोग फालतू कामासाठी होताना दिसतो. येथील लोखंड, इलेक्ट्रिक वायर चोरीला गेली. महापालिका प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष आहे.

# आयटीआर भरल्याने अनेक लाडक्या बहिणींचा लाभ बंद

## ♦ आयटीआर फाईल बनली लाडक्या बहिणींची सवत

प्रतिनिधी ३० जून

**अकोला:** चांगलं घर आणि व्यवसाय उभा करण्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकांकडून कर्ज काढावे लागते. मात्र, आयटीआर भरल्याशिवाय बँका दारात उभे करीत नाहीत. त्यामुळे शून्य भांडवल असताना 'आयटीआर' भरला आणि राज्य सरकारच्या लाडक्या बहिणी योजनेतून अनेक महिला बाद झाल्याची उदाहरणे राज्यात समोर आली आहेत. त्यावर अनेक लाडक्या बहिणींनी आक्षेप घेत रोष व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत प्रथम सरसकट २१ वर्षापुढील महिला मुलींना १५०० रुपयांचा लाभ सुरू करण्यात आला. विधानसभा निवडणुकीदरम्यान कोणतेही निकष न लावता ही योजना सुरू करण्यात आली. त्याचा महायुती सरकारला निवडणुकीत मोठा लाभ झाला. सरसकट महिलांना दीड हजार रुपये मिळत असल्याने सरकारी तिजोरीवर भार वाढत गेला.त्यामुळे निकष, पात्रता



योजनेतील लाभार्थ्यांची संख्या कमी करण्याचा सपाटाच सरकारने लावला. मागील तीन महिन्यांपासून अनेक लाडक्या बहिणींचे हप्ते बंद झाले आहेत. शासकीय यंत्रणेकडे चौकशी केली असता कुटुंबातील व्यक्तीने कर्जासाठी राष्ट्रीयीकृत बँकेच्या नियमा प्रमाणे आयटीआर भरल्याने बहतांश महिलांचा लाभ बंद करण्यात आला आहे

### आवास योजनेच्या अनुदानात घर होते का ?

महागाईच्या काळात सरकारी प्रधानमंत्री आवास योजनेच्या रकमेत घर बांधणे शक्य आहे का? असा सवाल लाडक्या बहिणींनी केला आहे. कर्ज घेतले तरच हक्काचे घर होऊ शकते. त्यासाठी अनेकांनी शून्य टॅक्स भरत 'आयटीआर' फाईल भरली. मात्र, हीच फाईल आता गरजू लाडक्या बहिणींसाठी अपात्रेची सवत बनली. राज्यातील अनेक महिलांचा लाभ आयटीआर भरल्याने बंद झाला असल्याची माहिती महिला आणि बालविकास विभागाकडून समजली. मात्र ती नेमकी संख्या समजू शकली नाही. चांगले घर, व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज घेताना बँका तीन वर्षांचे 'आयटीआर' भरले आहे का? याची माहिती घेतात, मात्र याच निकषामुळे गरजू गृहिणीचे दीड हजार रुपये बंद झाले. राज्यात अशा शेकडो गरजू महिला असून, 'आयटीआर'मुळे लाभ बंद झालेल्या महिलांना तातडीने पात्र ठरवण्याची मागणी होत आहे.

# काटेपूर्णा प्री–मान्सून बर्ड सर्व्हे उत्साहात




प्रतिनिधी ३० जून

**अकोला :** अकोला वन्यजीव विभाग, निसर्गकट्टा, अकोला, वत्सगुल्म जैवविविधता संवर्धन संस्था, वाशिम व महाराष्ट्र पक्षिमित्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला काटेपुर्णा प्री-मान्सून बर्ड सर्व्हे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

सर्व्हेच्या आयोजनाची भुमिका मांडतांना मानद वन्यजीव रक्षक अमोल सावंत यांनी सांगितले की, काटेपूर्णा अभयारण्यातील पक्ष्यांच्या समृद्ध विविधतेचा शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करून हि सर्व माहिती जगभरातील पक्षी अभ्यासकांना उपलब्ध करून देण्यासाठी या सर्वेचे आयोजन करण्यात आले. या सर्व्हेच्या समारोपप्रसंगी अकोला वन्यजीव विभागाचे विभागीय वन अधिकारी यशवंत नागुलवार , वाशिम जिल्हा चे उपवनसंरक्षक माधवराज, महाराष्ट्र पक्षीमित्रचे जयंत वडतकर, वाशिमचे मानद वन्यजीव रक्षक आकाश आहाळे, अकोल्याचे मानद वन्यजीव रक्षक अमोल सावंत, मानद वन्यजीव रक्षक तथा प्राचार्य डॉ. मिलिंद शिरभाते व वत्सगुल्म जैवविविधता संवर्धनचे पुरूषोत्तम इंगळे हे उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना यशवंत नागुलवार म्हणाले की, या उपक्रमामुळे सहभागींच्या पक्षीनिरीक्षण कौशल्यात वाढ होण्याबरोबरच वन्यजीव व जैवविविधता संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासही या सर्वेची मोठी मदत झाली. या वेळी सर्व सहभागींचा सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

### संपूर्ण देशातून ३० पक्षी अभ्यासक,विद्यार्थ्यांचा सहभाग


काटेपूर्णा अभयारण्यात तीन दिवस चाललेल्या या सर्व्हेमध्ये उत्तराखंड, पंजाब, मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा, देहरादून, लुधियाना, इंदौर, भोपाल, बुऱ्हाणपूर, बिलासपूर, दुर्ग गोंदिया, हैदराबाद, नागपूर, पुणे , जालना, लोणार, अमरावती, वाशिम व अकोला या शहरातून आलेल्या ३० पक्षी- निसर्ग अभ्यासक आणि पर्यावरण शास्त्रातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

### १५३ पक्ष्यांची झाली नोंद

तीन दिवसात ४ वेळा १० गटातून काटेपूर्णा अभयारण्यच्या प्रत्येक भागात सर्व्हे करण्यात आला. १५३ पक्ष्यांची नोंद झाली, ज्यामध्ये स्थानिक पक्ष्यांसह मान्सूनपूर्व आफ्रिकेतून भारतात स्थलांतर करून येणारा पाईड कूकू सह कॉमन कूकू, इंडियन कूकू, ग्रे बेलीड कूकू, कॉमन हॉक कूकू आणि इंडियन पिट्टा या पक्ष्यांच्या महत्वपूर्ण नोंदी ईबर्ड या आंतरराष्ट्रीय वेबसाईटवर नोंदविण्यात आल्या.

# पंचगव्हाण येथे मुसळधार पाऊस

## ♦ लोकांच्या घरात पाणी शिरले



प्रतिनिधी ३० जून

**तेल्हारा :** तालुक्यातील पंचगव्हाण येथे मुसळधार पाऊस पडल्याने नागरिकांच्या घरात पाणी शिरले. घरातून पाण्याचे लोट वाहत होते. पाण्याचा प्रवाह इतका होता की लोकांना घरात प्रवेश करणे कठीण झाले. एका महिलेने घरात शिरलेल्या पाण्यात बसून तीव्रता दाखवली. अनेक लोकांच्या घरात पाणी शिरल्यामुळे त्यांचे नुकसान झाले पंचगव्हाण येथे सोमवारी सायंकाळी झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक लोकांच्या घरात पाणी शिरले. घरातून पाण्याचे पाट वाहत होते. ज्यांची कच्ची घरे आहेत. त्यांची अवस्था बिकट झाली. घरात पाणी शिरल्याने पाय ठेवायला देखील जागा नव्हती. काही जणांना अन्यत्र आसरा घ्यावा लागला. सामाजिक कार्यकर्त्यांनी आपत्तीग्रस्तांना मदतीचा हात दिला. परंतु अतिवृष्टीमुळे गावातील काही भागात दाणादाण उडालेली दिसली. नुकसान झालेल्यांना तातडीने मदत मिळावी अशी मागणी आहे.

# हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेटसाठी ३० जून अंतिम मुदत

प्रतिनिधी ३० जून

**अमरावती:** केंद्रीय मोटार वाहन नियमानुसार राज्य शासनाने सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एचएसआरपी) बसविण्याची तरतूद केली आहे. ही नंबर प्लेट बसविण्यासाठी ३० जून अंतिम मुदत आहे.

वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यांवर धावणाऱ्या वाहनांची अचूक ओळख पटविणे आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील सर्व वाहनधारकांसह शासकीय, निमशासकीय कार्यालये व बँकांनी त्यांच्या १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसविणे बंधनकारक आहे. ही मुदत वाढवून ३० जून २०२६ पर्यंत करण्यात आली आहे.

विहित मुदतीनंतर नियमानुसार वायुवेग पथकाद्वारे दि. १ जुलै २०२६ पासून दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. एचएसआरपी नंबरप्लेट नसलेली वाहने किंवा बनावट एचएसआरपी असलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. तसेच अशा वाहनांचे परिवहन कार्यालयातील कामकाज थांबविण्यात येणार आहे, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी नंदकिशोर काळे यांनी कळविले आहे.

# महिलेचा मृत्यू: ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी ३० जून

**खामगाव :** राष्ट्रीय महामार्गावरील कोलोरी शिवारातील एका ढाब्याजवळ भरधाव ट्रकच्या धडकेत अंदाजे ५० ते ५५ वर्षीय अनोळखी महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना २४ जून रोजी रात्री ११ वाजण्यापूर्वी घडली होती.

तपासादरम्यान ट्रक (क्र. एमएच १२ आरएन ८३१४) चालक शहानूर मोहम्मद सय्यद (रा. लोणीकाळभोर, जि. पुणे) याने वाहन भरधाव व निष्काळजीने चालवल्यामुळे अपघात झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

हा गुन्हा सहायक पोलिस निरीक्षक रवी केरबा मुंडे यांच्या फिर्यादीवरून २८ जून रोजी रात्री ११:४० वाजता नोंदविण्यात आला. यापूर्वी या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आला होता.



हिवरखेड जिल्हा परिषद शाळेत आजपासून शाळेची घंटा वाजली. विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला.

# जिल्ह्यात दमदार पावसाची शक्यता

प्रतिनिधी ३० जून

**अकोला :** जिल्ह्यात २९ जून ते २ जुलैपर्यंत काही ठिकाणी विजाच्या कडकडासह पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली आहे. यादरम्यान ताशी ४० ते ५० किमी प्रतितास याप्रमाणे हवेचा वेग राहण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि ढगांच्या गडगडाटांसह विजा आणि पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. अशावेळी आवश्यक ते कारण असल्याशिवाय घराबाहेर पडू नका, जनावरांना झाडांना किंवा विजेच्या तारेच्या खाली बांधू नका. विज, वारा व पावसापासून बचावाकरीता सुरक्षीत ठिकाणी आश्रय घेण्यात यावा. अशास्थितीत झाडाखाली आश्रय घेऊ नये. पाऊस व विजाच्या स्थितीत मोबाईल फोनचा उपयोग टाळावा. सर्व यंत्रणांनी योग्य ती दक्षता घेण्याच्या सुचना देण्यात आले आहे, असे आवाहन करण्यात आले आहे.







हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK